| लातूर | वर्ष ३५ वे | अंक ८८ वा | शनिवार, दिनांक २० जून २०२६ | पृष्ठे ६ | किंमत १ रू.

RNI 47034/64

# लातूर समाचार

LATUR SAMACHAR

(सांज दैनिक)

प्रकाशन: लातूर

पोष्ट परवाना L2/RNP/OMD- 52/24-26

Email-dainiklatursamachar@gmail.com

संस्थापक : स्व.शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक) कार्यकारी संपादक : शिवाजी दयानंद जडे

# पवनराजे निंबाळकर हत्याकांडाचा २० वर्षांनंतर अंतिम निकाल

## पुराव्याअभावी माजी मंत्री पद्मसिंह पाटलांसह सर्वांची निर्दोष मुक्तता







**मुक्त झालेल्यांची नावे**

१. डॉ. पद्मसिंह पाटील
२. सतीश मंदाडे
३. मोहन शुक्ला
४. शशिकांत कुलकर्णी
५. कैलास यादव
६. दिनेश तिवारी
७. पिंटू सिंग
८. छोटे पांडे

**मुंबई/प्रतिनिधी:** महाराष्ट्राच्या राजकीय वर्तुळाला हादरवून सोडणाऱ्या आणि गेल्या दोन दशकांपासून प्रलंबित असलेल्या बहुचर्चित पवनराजे निंबाळकर दुहेरी हत्याकांड प्रकरणाचा अखेर शनिवारी (२० जून २०२६) अंतिम निकाल लागला आहे. या खटल्याचा संपूर्ण पाया ज्या माफीच्या साक्षीदारावर उभा होता, त्याची साक्ष पूर्णपणे अविश्वसनीय, संशयास्पद आणि विसंगत ठरल्याचे स्पष्ट करत न्यायालयाने माजी गृहमंत्री डॉ. पद्मसिंह पाटील यांच्यासह सर्वांची संशयाचा फायदा देऊन निर्दोष मुक्तता केली आहे. हा निकाल खासदार ओमराजे निंबाळकर आणि निंबाळकर कुटुंबासाठी मोठा कायदेशीर धक्का मानला जात आहे.

सीबीआय विशेष न्यायालयाचे न्यायमूर्ती एस. आर. नावंदर यांच्या कोर्ट क्र. ५५ मध्ये ही ऐतिहासिक सुनावणी पार पडली. बिहारच्या तुरुंगात असलेला मुख्य शूटर पिंटू सिंग याला पोलिसांनी उशिरा हजर केल्यामुळे काही काळ सस्पेन्स वाढला होता. तो न्यायालयात हजर होण्याआधीच कडेकोट पोलीस बंदोबस्तात न्यायालयाने निकालवाचनाला सुरुवात केली.

**न्यायमूर्तींचे सविस्तर निकालवाचन आणि तपासावरील ताशेरे**

न्यायाधीश एस. आर. नावंदर यांनी निकालपत्राचे वाचन करताना तपास यंत्रणांच्या ढिसाळ कारभारावर आणि पोलिसांच्या चुकांवर अत्यंत गंभीर बोट ठेवले. न्यायाधीशांचे सविस्तर निकालवाचन खालीलप्रमाणे होते. २० वर्षांनंतर मी हा निकाल देतोय, ही अत्यंत दुर्दैवी घटना आहे की एका लोकनेत्याची अशा प्रकारे कळंबोली येथे गोळीबार करून हत्या होते. सुरुवातीला कळंबोली पोलीस, नंतर नवी मुंबई गुन्हे शाखा आणि अखेर सीबीआयकडे हा तपास गेला. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाने खटला या कोर्टात आला. या प्रकरणात १२७ साक्षीदार तपासले गेले. न्यायालय केवळ कायद्याच्या चौकटीत राहूनच हा निकाल देत आहे.

**मोबाईल जप्त केले नाहीत, सीडीआर गायब**

तपासातील सर्वात मोठ्या त्रुटीवर बोट ठेवताना न्यायालय म्हणाले, या खटल्याचा तपास करताना कुठल्याही व्यक्तींचा मोबाईल फोन (Mobile Phone) जप्त केलेला नाही. त्यांचे कॉल डिटेल्स रेकॉर्ड (CDR) काढले गेले नाहीत. जप्ती पंचनाम्यात व्यक्तींच्या खिशात काय सापडले याची नोंद नाही. जर सीडीआर काढले असते, तर गुन्हेगार एकमेकांच्या संपर्कात होते का, हे स्पष्ट झाले असते. घटनाक्रमात १२ कॉल रेकॉर्डचा उल्लेख आहे, ज्यातील एक फोन पीसीओ वरून झाला होता. पवनराजेंना थेट फोन आलाच नाही, तर मग पाठलागाची आणि संवादाची ही कथा ग्राह्य कशी धरायची?

**हत्येच्या रात्रीबाबत प्रत्येक वेळी वेगवेगळ्या 'चार कहाण्या'**

न्यायालयाने निरीक्षण नोंदवले की, माफीच्या साक्षीदाराने हत्येच्या दिवशी तो मुंबईबाहेर कसा गेला, याच्या वेळोवेळी चार वेगवेगळ्या गोष्टी सांगितल्या. बोरिवलीहून गाडी पकडून थेट श्रीनाथजी मार्गे पडेसरीला गावी गेलो. आधी अहमदाबादला गेलो, मग श्रीनाथजीवरून गावी गेलो. बोरिवलीहून अहमदाबादला मित्राकडे मांडववाड्याला गेलो. बोरिवलीहून नाथद्वारा, तिथून कोठारावर शाळेत राहिलो, मग मांडववाड्यात मित्राकडे आणि तिथून अहमदाबादच्या 'भाग्यदोय' हॉटेलमध्ये राहिलो, अशा चार गोष्टी त्याने सांगितल्या. न्यायाधीश म्हणाले, प्रत्येक वेळी नवीन स्टोरी सांगणाऱ्या या साक्षीदाराची साक्ष अजिबात विश्वासार्ह मानली जाऊ शकत नाही.

**गाडीच्या रंगाचा आणि घटनास्थळाचा घोळ**

गुन्ह्यात वापरलेली गाडी जळून खाक झाली होती. तरीही जप्ती पंचनाम्यात तिचा रंग 'हिरवा' कसा लिहिला? कागदपत्रे पाहून रंग लिहिल्याचे अधिकारी सांगतात, मात्र मूळ पुरावा सिद्ध होत नाही. एका साक्षीदाराने गाडी छोट्या घराच्या बाजूला उभी असल्याचे सांगितले, दुसऱ्याने बंगल्याच्या बाजूला, तर पोलीस रेकॉर्डनुसार ती मोकळ्या जागेत सापडली. या सर्व लहान गोष्टींमधील तफावत सरकारी पक्षाचा हेतू संशयास्पद बनवते.

**राजकीय दरी मान्य, पण पुराव्यांचा अभाव; सर्वांना मुक्त**

न्यायालयाने मान्य केले की, २००२ नंतर पवनराजे निंबाळकर आणि डॉ. पद्मसिंह पाटील यांच्यात तेरणा साखर कारखाना आणि निवडणुकीतील पराभवामुळे मोठी राजकीय दरी निर्माण झाली होती. पूर्ववैमनस्यातून हत्येचा कट रचल्याचा सीबीआयचा आरोप होता आणि पवनराजेंनी जीवाला धोका असल्याचे पत्रही जिल्हाधिकाऱ्यांना दिले होते. मात्र, केवळ राजकीय वैमनस्य आहे म्हणून कोणाला फासावर लटकवता येत नाही, त्यासाठी कायद्याला ठोस पुराव्यांची गरज असते.

# मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस सरकारचा मोठा निर्णय

## सरकारी जागेची परस्पर मालकी नोंदवणाऱ्यांना दणका

**मुंबई/प्रतिनिधी:** राज्यात मोठ्या संख्येने असलेल्या भाडेतत्वावरील शासकीय जमिनीवर स्वतःचीच मालकी सांगणाऱ्या संस्था, कंपन्या, प्राधिकरणे तसेच व्यक्तींना देवेंद्र फडणवीस सरकारने मोठा दणका दिला आहे.आता अशा सर्व भाडेपट्ट्यावरील जमिनींच्या अधिकार अभिलेखात 'कब्जेदार' म्हणून केवळ 'महाराष्ट्र शासन' हीच नोंद करण्याचा निर्णय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सूचनेवरून महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी घेतला आहे.

महसूल विभागाने याबाबत परिपत्रक जारी केले असून,संपूर्ण राज्यात पुढील तीन महिने विशेष मोहीम अशा नोंदी तपासून त्या कब्जेदार म्हणून महाराष्ट्र शासनाच्या नावावर करण्याचे निर्देश सर्व जिल्हाधिकाऱ्यांना महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिले आहेत.

शासनाकडून अनेक व्यक्ती किंवा संस्थांना ३०, ९९ किंवा ९९९ वर्षांच्या दीर्घ मुदतीसाठी जमिनी भाडेकरारावर दिल्या जातात. मात्र, या जमिनींच्या कब्जेदार रकान्यात (सदरी ) रमहाराष्ट्र शासनाच्या नावाऐवजी शासनाच्या परवानगीशिवाय भाडेपट्टा धारकांचीच नावे लागल्याचा धक्कादायक प्रकार निदर्शनास आला आहे.तत्कालीन अधिकारी व कर्मचाऱ्यांनी रीतसर नोंदी न घेतल्याने,अनेक भाडेपट्टाधारक या सरकारी जमिनी स्वतःच्याच मालकीच्या (खासगी) असल्याचे गृहीत धरत आहेत,ज्यातून अनेक न्यायालयीन प्रकरणे उद्भवत आहेत. हा 'खासगी' मालकीचा खेळ मोडून काढण्यासाठी आता सरकारने थेट कारवाईचा बडगा उगारला असून, भाडेपट्ट्याने प्रदान केलेल्या जमिनींच्या अधिकार अभिलेखातील कब्जेदार सदरी आता केवळ महाराष्ट्र शासनाच्या नावाची नोंद असणे बंधनकारक करण्यात आले आहे.

**भाडेपट्टाधारक आता 'इतर अधिकारात'**

भाडेपट्टाधारकाचे नाव, भाडेपट्टयाचा कालावधी आणि ज्या अटींवर जमीन दिली आहे,त्याची नोंद आता 'इतर अधिकार' या सदरी घेण्यात येईल.

**३ महिन्यांचा अल्टीमेटम**

सर्व जिल्हाधिकाऱ्यांनी तात्काळ विशेष मोहीम हाती घेऊन,रितसर कार्यपद्धती अवलंबून अवघ्या तीन महिन्यांत या सर्व अद्ययावत नोंदी घ्याव्यात.महाराष्ट्र जमीन महसूल संहिता,१९६६ अंमलात येण्यापूर्वी कोणत्याही कायद्याखाली कायमस्वरुपी अथवा नूतनीकरणाचा पर्याय देऊन ५० वर्षांच्या मुदतीसाठी दिलेल्या भाडेपट्ट्यांना संहितेच्या कलम २९ (३) क नुसार 'भोगवटादार वर्ग-२' च्या तरतुदी लागू होतील.जिल्हाधिकाऱ्यांनी अशा भाडेपट्टा सदरी ३० दिवसांच्या आत 'भोगवटादार वर्ग-२' अशी नोंद घेऊन शासनाला अहवाल सादर करण्याचे स्पष्ट आदेश महसूल मंत्री बावनकुळे यांनी दिले आहेत.

**मुंबईतही आवळल्या नाड्या**

मुंबई शहरासाठी लागू असलेल्या नियमांनुसार,अस्तित्वात असलेल्या सर्व पट्ट्यांच्या हस्तांतरणाच्या निर्बंधांबाबतच्या नोंदीदेखील मुंबई शहरातील शासकीय जमिनीच्या अधिकार अभिलेखात तात्काळ घेण्याचे आदेश शासनाने दिले आहेत.त्यामुळे मोक्याच्या ठिकाणी असलेल्या सरकारी जमिनींवर मालकी हक्क सांगणाऱ्यांना आता चांगलाच चाप बसणार आहे.

**मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली महसूल प्रशासन अधिक पारदर्शक,अचूक आणि नागरिकाभिमुख करण्यावर भर दिला जात आहे.शासकीय भाडेपट्टा जमिनींच्या नोंदींबाबत राज्यभर एकसमान आणि स्पष्ट प्रणाली निर्माण करण्यासाठी हे निर्देश जारी करण्यात आले आहेत.यामुळे शासनाच्या मालकीच्या जमिनींबाबतची माहिती अधिक अचूक होईल,अनावश्यक वाद कमी होतील आणि महसूल व्यवस्थापन अधिक सक्षमहोईल.**
**- चंद्रशेखर बावनकुळे, महसूल मंत्री.**



## प्रभात किरणे

कौतुकाचे शब्द वाढवती बळ
मदतीचा हात,सरे वाईट काळ
ज्यांच्या अंगी संत पणाचे गुण
भूवरी तोच भगवान,पुण्यवान
-इंजि. नागनाथ कलवले
लातूर ९७६४७ ८८२८८

## कुजबुज

-डॉ. संजय जमदाडे



**कर्जमाफी योजनेचे निकष बदलण्यासाठी नवीन समिती गठीत...**



## चिमटा दयाचा

गुटखा बंदी असताना
राज्यात मिळतो कसा!!
कारखान्यावर धाड
टाकण्यापेक्षा टपऱ्यावर धाडी
पडतात कशा?
समुळ उच्चाटनासाठी
कारखान्यावर धाड टाका!!

# डॉ. जनार्दन वाघमारे यांचे स्मारक उभारण्याची मागणी-शिष्टमंडळाने घेतली कुलगुरू डॉ. चासकर यांची भेट



**लातूर/ प्रतिनिधी :** मराठवाड्यातील नांदेडच्या स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे संस्थापक कुलगुरू डॉ. जनार्दन वाघमारे यांचे स्मारक विद्यापीठ परिसरात उभारण्याची मागणी शुक्रवारी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मनोहर चासकर यांना डॉ. जनार्दन वाघमारे विचार मंचच्या शिष्टमंडळाने भेटून केली.

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाची मुहूर्तमेढ रोवून मराठवाड्यातील उच्च शिक्षणाची ज्योत प्रज्वलित करणारे संस्थापक कुलगुरु, थोर शिक्षणतज्ञ कै. डॉ. जनार्दन वाघमारे यांचे कार्य अजरामर आहे. त्यांच्या शैक्षणिक, सामाजिक व प्रशासकीय योगदानाची जाणीव पुढील पिढ्यांना व्हावी व त्यातून प्रेरणा मिळावी या हेतूने विद्यापीठ परिसरात त्यांचे स्मारक उभारण्याची मागणी केली आहे. १७ सप्टेंबर १९९४ रोजी मराठवाड्यातील उच्च शिक्षणाच्या विकेंद्रीकरणासाठी स्वामी रामनंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाची स्थापना झाली. स्थापना काळात अनेक प्रशासकीय व शैक्षणिक आव्हाने असताना डॉ. जनार्दन वाघमारे यांनी संस्थापक कुलगुरु म्हणून १७/०९/१९९४ ते १६/०९/१९९९ पर्यंत दूरदृष्टीने काम केले. विद्यापीठाची इमारत, विविध अभ्यासक्रम, महाविद्यालय संलग्नता, नोकरभरती या सर्वांची पायाभरणी अत्यंत मजबूत पध्दतीने त्यांनी केली. त्यांचे स्मारक हे केवळ व्यक्तीचे स्मारक नसून विद्यापीठाच्या निर्मिती पर्वाचे प्रतिक ठरेल.

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड चे संस्थापक कुलगुरु म्हणून त्यांचे आधुनिक अशा पध्दतीचे स्मारक उभा करुन तरुण पिढीला प्रेरणा देण्यात यावी अशी मागणी डॉ. जनार्दन वाघमारे विचार मंचच्या शिष्टमंडळाने केली आहे. या शिष्टमंडळात विचार मंचचे अध्यक्ष प्रा. सुधीर साळुंखे, सचिव डॉ. दिगंबर नेटके, सिनेट सदस्य डॉ. अशोक मोटे, सिनेट सदस्य तथा प्राचार्य डॉ. संजय वाघमारे, प्राचार्य डॉ. सतीश यादव, डॉ. विनोद चव्हाण, विक्रम कदम, ड. निशांत वाघमारे आदींचा सहभाग होता.






ओ३म् भूर्भुवः स्वः ।
तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि ।
धियो यो नः प्रचोदयात् ।।

लातूर समाचार

## राज्यात राजकारण तापले

महाराष्ट्रात आता पर्यंत राजकारणात उलथापालथ संघर्षात होत नव्हती. महाराष्ट्र ही संताची व वीरांची भुमी आहे. राज्य शाहु, फुले, आंबेडकर आदिचे समजले जाते. असे असताना एकदा वाट चुकली की, पुढे मोठा परिणाम भोगावे लागतात याचा प्रत्यय आता आला आहे. राज्यात केवळ हिंदुऱ्हदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांची शिवसेना समजली किंवा ओळखली जात होती. हिंदुऱ्हदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांचे वजन देश भर होते. ते किंग्ज मेकर होते. त्यांच्या सल्ल्याने राज्याचा मुख्यमंत्रीच काय देशाचा पंतप्रधान बनविताना मार्गदर्शन घेतले जात होते. हिंदुंना मोठे संरक्षण देणारे ठाकरे होते. मुंबईत मोठा दरारा होता. ते न्यायकारी होते. जातीद्वेष्टा नव्हते. मुस्लीम विरोधीही नव्हते. जे देशविरोधी काम करतात त्यांच्या बाबत राग होता. शिवसेनेत मुस्लीम कार्यकर्ते होते. त्यांचा हिंदुत्वादीबाणा लवचिक नव्हता. त्यांनी स्थापन केलेली शिवसेना आज विखुरली जात आहे. यामागील कारणे अनेक असली तरी पक्षावर असणारी पकड ढिली आहे हे मुख्य कारण आहे. मोठ्या प्रमाणात मध्यस्थ निर्माण झाले होते. मुळात उद्धव ठाकरे यांनी मुख्यमंत्रीपद स्विकारला नको होते. तसे पाहीले तर हिंदुऱ्हदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांना सहज पंतप्रधान होता आले असते. ते धुर्त राजकारणी, अभ्यासू होते. दुरगामी परिणामाची त्यांना कल्पना होती. राज्य शिवसेनेकडे आले त्यावेळी मनोहर जोशी यांना मुख्यमंत्री केले, त्याना पटले नाही नंतर नारायण राणे यांना केले. त्यानी असे पर्यंत हिंदुना मोठे पाठबळ होते. त्यांच्यामागे हिंदु हा पोरका झाला हे मान्यच केले पाहिजे. एकतर उद्धव ठाकरे व राज ठाकरे यांच्या कार्यशैलीत मोठी तफावत आहे. महाबळेश्वरयेथील कार्यकारणीच्या बैठकित उद्धव ठाकरे यांच्या एवजी कार्याध्यक्षपद राज ठाकरे यांना दिले असते तर आज वाईट स्थिती पाहावयास मिळाली नसती. आज संजय राऊत यांचे अधिक बोलणे हे सर्वांना रुजणारे नाही. शब्द हे शस्त्र आहे, धारधार बाण असतात. हे लक्षात घेता, संजय राऊत यांनी बोलण्यात लगाम लावला पाहिजे. असो, सध्याला उद्धव ठाकरे यांच्याकडील सहा खासदार वेगळे होत आहेत.झाल्याचे सांगतात, ते वेगळे होण्यास कारणी कोणती आहेत. त्यांनी असा निर्णय का घेतला यावर सखोल चिंतनाची गरज आहे. शिवसेना आता एकनाथ शिंदे आहे असे समजले जाते. दोन शिवसेना असल्यातरी सत्तेत एकनाथ शिंदे यांची शिवसेना आहे. एकनाथ शिंदे राज्याचे मुख्यमंत्री राहीले आहेत. आता ते उपमुख्यमंत्रीपदी विराजमाना आहेत. त्यांनी आपल्यापरिने खासदार निवडूण आणले. वास्तविक राज्यात सर्वात वाईट स्थिती उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेची आहे. तसे पाहिले तर हिंदुत्वमुद्दा ऱ्हदयात असताना उद्धवजी काँग्रेस सोबत जाण्याची गरज नव्हती. शरद पवार यांनी खेळलेली ही चाल त्यांच्यासाठी चांगली ठरली नाही तर याबाबी उद्धव ठाकरे हे बदनाम झाले. हिंदुऱ्हदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांनी कदापी काँग्रेसशी जुळवून घेतले नाही, राष्ट्रवादीला थारा मिळू दिला नाही. अशा पक्षाबरोबर उद्धव ठाकरे यांनी महाआघाडीत जावून आपली माती करून घेतली. काँग्रेसशी कशीही हिंदुऱ्हदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांचे जमले नाही मात्र उद्धव ठाकरे यांनी सत्तेसाठी जुळवून घेतले हेच आगामी काळात घातक ठरले आहे. मुख्यमंत्री इतरांना करणे अपेक्षित होते. ते स्वतः मुख्यमंत्रीपदी विराजमान झाले. ही पहिली मोठी चुक झाली. दुसरी चुक त्यांच्या पासून एकनाथ शिंदे सह अनेक आमदार दूर गेले. त्याच वेळी मनधरणी करून परत पक्षात स्वाभिमानाने परत आणले असते तर आज राज्यात शिवसेना मोठी वाढली असती. राज्यात शिवसेनेची ताकद वाढत होती. पंचवीस वर्ष भाजपाची साथ घेवून ते काही काळ सत्तेत होते. अल्पकाळ सत्ताभोगून कायम खच्चीकरण होणे अतिषय माहागात पडले आहे. आज उद्धव ठाकरे यांच्या पक्षाची स्थिती ही आपल्या हाताने वाईट बनविली आहे. सहा खासदार फुटणे हे योग्य नाही. का दूर गेले. यामागील कारणांचा शोध घेतला पाहिजे. नसता राज्यातील उद्धव ठाकरे यांचे आमदार फुटण्याची शक्यता आहे. खासदार दुर जावू शकतात तर आमदार का जावू शकत नाहीत? राज्यात तसे पाहिले तर काहीही होवू शकते. घडू शकते. राज्यात तीन पक्षाचे सरकार आहे. मुख्यमंत्री भाजपाचे आहेत. दोन उपमुख्यमंत्री आहेत. सुनेत्रा पवार व एकनाथ शिंदे असले तरी राज्यात एकनाथ शिंदे यांचे वजन वेगळे आहे. आजही केंद्रात ज्यांची चलती आहे त्याची गृहमंत्री अमित शहा यांची जवळीकता आहे. गृहमंत्री अमित शहा यांचे महाराष्ट्रावर चांगले लक्ष आहे. तसे पाहिले तर सर्वात वाईट आवस्था विरोधीपक्षाची आहे. शरद पवार यांची राष्ट्रवादी, उद्धवजीची शिवसेना व काँग्रेसचे असित्वाची लढाई आहे. दोन आकडी आमदार आहेत. उद्धव सेनेचे खासदार फुटली तर आमदार दूर जाण्याची शक्यता आहे. त्यामुळे उद्धव ठाकरे यांनी आपल्याच पायावर दगड मारून घेतला आहे. भाजपासोबत जुळवुन घेतले असते तर आदित्य हे उपमुख्यमंत्री असले असते. एकनाथ शिंदे दूर गेले नसते. आज परिस्थिती पाहिली तर देशात अनेक घटक पक्ष रालोआ सोबत जात आहेत. तीनशेचा आकडा सहज पार होवून चारशेचा आकडा काढतो की काय असे वाटत आहे. आगामी काळात तसा भाजपाला टक्कर देणारा पक्ष दिसून येत नाही. काँग्रेस स्पर्धक समजला जात असला तरी तो नाही. शंभरच्या आता त्यांचे खासदार आहे तो स्पर्धक असू शकत नाही. ममता बॅनर्जी, आखिलेश यादव हे थंड दिसून येतात. त्यामुळे देशातील परिस्थिती पाहिली तर शह देणारा एकही पक्ष दिसून येत नाही. महाराष्ट्रात उद्धव ठाकरे यांची स्थिती वाईट आहे. यातून ते मार्ग कसा काढतील हे सांगणे कठिण आहे. एक चुक किंवा गर्व किती महागाम पडू शकतो हे एक उदा. आहे. त्यामुळे राजकारण खरे नसते असे बोलतात ते चुकीचे नाही. दोन खासदार केवळ संसदेत असलेला भाजपा हा बारावर्षापासून सत्तेत आहे. पंडित नेहरू जे देशाचे पहिले पंतप्रधान होते त्यांना मागे टाकून भाजपाचे नरेंद्र मोदी सत्तेत आहे. याचा सकारात्मक पद्धतीने विचार केला पाहिजे. आपले काय चुकते याचे चिंतन केले पहिजे. राहुल व प्रियंका ह्या सतत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना शिव्या घालतात. त्याचा काय उपयोग? उलट भाजपाची ताकद वाढत आहे. प.बंगाल जो ममता बॅनर्जींचा बालेकिल्ला फोडून तेथे सत्ता स्थापन केली. त्यामुळे वरचेवर एक-एक घटकप्रादेशिक पक्ष नरेंद्र मोदी यांच्याशी मैत्री करत आहेत. महाराष्ट्रात आगामी काळात निश्चित काही तरी परिवर्तन घडणार असेच चिन्ह दिसून येत आहेत. त्यामुळे उद्धव ठाकरे, काँग्रेस व शरद पवार यांच्या पक्षाने गाफिल राहाणे परवडणारे नाही हे लक्षात घेतले पाहिजे.

# विश्व तुमचं.. आणि आभासी युग !

आपण तंत्रज्ञानाने विकासाचा नवा टप्पा गाठतोय ही अतिशय समाधानाची नव्हे तर आनंदाची बाब आहे. मात्र या साऱ्या प्रगतीमध्ये मोठ्या प्रमाणावर तोटा देखील आहे. जसे नाण्याला दोन बाजू असतात तसच याबाबतीत देखील आहे. आलेला कृत्रिम बुद्धीमता आणि इतर समाज माध्यमांनी नवा बदल आणला आहे. समाज माध्यमे जशी प्रगत झाली तसे त्याचे धोके देखील आता दिसत आहेत. यात सर्वात मोठा धोका हा मानसिक आरोग्याला आहे.




आरोग्याचा आपण विचार करतो त्यावेळी आपणास शारिरीक आरोग्या सोबतच मानसिक आरोग्याचा देखील विचार करणे आवश्यक असते आणि नेमकेपणाने आपणास याचा विसर पडलेला दिसतो.

घरात चार जणांचे कुटुंब ही शहरीकरणातून नव्याने आलेली समस्या आहे. त्यातही काही कुटुंबात ३ जणच आहेत. अशीही स्थिती आहे. पूर्वीच्या काळी संयुक्त कुटुंब पद्धती होती. त्यावेळी घरातला काळ हा संवादाचा काळ होता. त्यावेळी रेडिओ शिवाय मनोरंजनाचे दुसरे साधन नव्हते. नंतर टिव्हीचा शिरकाव झाला मग २४ तास वाहिन्यांनी मनोरंजनाचा रतिब सुरु केला. आज देशातील विविध भाषक टीव्ही वाहिन्यांची संख्या ११७१ इतकी आहे.

मनोरंजनासाठी वाहिन्या कमी पडताहेत आणि आपण तयार केलेल्या कलाकृतींना व्यासपीठ मिळत नाही. या भुमिकेतून ओव्हर द टॉप अर्थात OTT चा प्रसार वेगात झाला.

हे सर्व घडत असताना इंटरनेटचा प्रसार वाढला. ज्याला माहिती तंत्रज्ञानाचे युग आपण म्हणतो तसं युग अवतरले. यात फेसबूक, एक्स तसेच इन्ट्राग्राम सारख्या संवाद माध्यमांसोबत दुहेरी संवाद, चित्र संवाद आणि संदेश वहन सुरु झाल. यात 'व्हॉटसअप' ने प्रत्येक हातातला मोबाईलने मानसिक शांततेला पहिला धक्का दिला.

'व्हॉटसअप' हातोहाती पोहचलं, त्यासोबत त्याचा दुरुपयोग मोठ्या प्रमाणावर दिसायला लागला. नवी पिढी अर्थात जेन-झी (Gen-z ) ने याला झटपट स्विकारलं असलं तरी जुनी पिढी कुठेतरी अडखळताना दिसत होती.

यानंतर आलेल्या 'रिल्स' ने एक क्रांती घडवली व सोबत नव्या पिढीची मानसिक शांतता पूर्णपणे संपवली. त्यातच जुन्या पिढीला आता या रिल्सचं 'व्यसन' जडलय की काय असं आता वाटायला लागले आहे. एका घरातील ४ माणसं ४ मोबाईल आणि ४ स्वतंत्र विश्व एकाच छताखाली अशी स्थिती आली आहे.

या रिल्सच्या प्रभावाने मोठ्या प्रमाणावर नवी पिढी दोन प्रकारे स्वतःचं नुकसान करून घेताना दिसते. 'रिल्स' च्या नादात होणारे अपघाती मृत्यू हा स्वतंत्र असा विषय आहे. मात्र आपल्या उपस्थितीची दखल घेणं आपल्या कामाला दाद मिळणं या अपेक्षा वाढलेला नव्या पिढीत नैराश्य वाढत आहे आणि ही धोक्याची घंटा आहे.

हातात मोबाईल घेऊन रस्ता ओलांडणारे अनेक जण दुर्दैवाने अपघाती मृत्यूत प्राण गमावून बसले आहेत. या माध्यमाच्या वेडापायी स्वतःची तहान-भूक हरपून झोपही विसरणारे नकळत स्वतःच्या आरोग्यावर परिणाम करून घेत आहेत

२०१३ साली मी या विषयावर प्रथम लिहिलं, त्यावेळी म्हंटल होत की, आठवड्यातून किमान एक 'मोबाईल हॉलीडे' सर्वांनी पाळावा. आता तर स्थिती अशी आली आहे की 'गॅझेट फ्री' अवर्स (तास) दिवसात किती असावेत हे ठरवावं लागणार आहे. टीव्ही, मोबाईत हे सारं मिळून आपला 'स्क्रीन टाईम' किती मर्यादीत ठेवायचा याचा निर्णय घ्यावा लागणार आहे.

मोबाईल हे संदेशवहन आणि केवळ संदेशवहन इतके मर्यादीत राहिलेलं नाही. मात्र आजही अमेरिकेसारख्या महासत्ता असणाऱ्या देशात 'पेजर' चा वापर अधिक केला जातो हे देखील आपण जाणून घेतलं पाहिजे. मोबाईल माझ्यासाठी कि मी मोबाईलसाठी हे ठरवावं लागणार आहे.

मोबाईलमधील कॉन्टेन्ट बघताना आपल्या मानसिक स्थितीत नेमकेपणाने काय बदल होतात याचा विचार होत नाही. 'न्यूरोसायन्स' च्या अभ्यासातून समोर आलं आहे की, आपल्या मेंदूत कृत्रिम लहरीतून आनंदाची अनुभूती देणारे 'डोपामाइन' असेल तर आपल्याला त्यात अधिक रस असतो, पण कृत्रिम डोपामाईन निर्मिती ही क्षणिक असते. काही झालं तरी ते पूर्णपणे आभासी विश्व आहे.

घरात कुटुंबासोबत होणारा अंवाद, मित्र-मैत्रीणीसोबत चर्चा करणे तसेच, प्रसंगी वाद-विवाद, आपल्या आसपासच्या निसर्गाचं आणि खऱ्या जगाचं भानं असणं म्हणजे खरा आनंद आहे. 'रिल्स' बघताना सोशल मिडिया साईटस् नकळत आपल्या आवडीचा वेध घेऊन त्याच पद्धतीच्या रिल्स सातत्याने आपणास दिसतील असे 'अल्गोरिदम' विकसित करून आपल्या मनाचा नकळत ताबा घेत आहे.

वय झाल म्हणून सांगत नाही पण रेडिओवर पुढचं गाणं कोणतं असेल याची अनिश्चितता आणि अपेक्षा व त्यातील आनंद वेगळा होता. १५ पैशांचं ख्यालीखुशाली कळवणारं टपाल पोस्टकार्ड जितका आनंद देत असे तितका आनंद या आभासी जगात निश्चित नाही.

या स्वागत आहे खऱ्या विश्वात... सोडा ते आभासी विश्व!

**- प्रशांत दैठणकर**
**९८२३१९९४६**

## पुदिना काळा पडतोय? या ५ टिप्स ठरतील फायदेशीर

उन्हाळा सुरू झाला की घराघरात पुदिन्याचा वापर वाढतो. पुदिन्याची चटणी, आम पन्हे, ताक, रायता, ज्यूस किंवा विविध पेयांमध्ये ताजेपणा आणण्यासाठी पुदिन्याचा मोठ्या प्रमाणावर वापर केला जातो. मात्र बाजारातून आणलेला ताजा पुदिना एक-दोन दिवसांतच कोमेजून जातो, पाने काळी पडतात किंवा सुकून खराब होतात. त्यामुळे चव बिघडते आणि पैशांचाही अपव्यय होतो.

उन्हाळ्यात जास्त तापमान आणि आर्द्रतेमुळे पालेभाज्या आणि हिरव्या पानांच्या गोष्टी लवकर खराब होतात. मात्र काही सोप्या पद्धती वापरल्यास पुदिना १० ते १५ दिवस ताजा ठेवता येऊ शकतो. त्यासाठी कोणत्याही महागड्या उपकरणाची गरज नसून घरातील साध्या वस्तूंचा वापर करून हे काम सहज करता येते.

**पुदिना धुतल्यानंतर पूर्ण कोरडा करा**

अनेक जण पुदिना धुवून थेट फ्रिजमध्ये ठेवतात. हीच सर्वात मोठी चूक ठरते. पानांवर राहिलेली ओलसरता पुदिना लवकर खराब करते. त्यामुळे पुदिना धुतल्यानंतर तो कापडावर किंवा किचन टॉवेलवर पसरवून पूर्णपणे कोरडा होऊ द्या. पानांवर पाण्याचा एकही थेंब राहू देऊ नका. त्यानंतरच तो साठवून ठेवा.

टिश्यू पेपरमध्ये गुंडाळून ठेवा

पुदिना जास्त काळ ताजा ठेवण्यासाठी ही सर्वात प्रभावी पद्धत मानली जाते. टिश्यू पेपर अतिरिक्त ओलावा शोषून घेतो आणि पाने कुजण्यापासून वाचवतो. पुदिना हलक्या हाताने टिश्यू पेपरमध्ये गुंडाळा आणि एअरटाइट डबा किंवा झिप लॉक पिशवीमध्ये ठेवून फ्रिजमध्ये ठेवा. या पद्धतीने पुदिना १० ते १५ दिवस ताजा राहू शकतो.

**पाण्याच्या बरणीत ठेवा**

जर तुम्हाला पुदिना अगदी ताजा ठेवायचा असेल, तर त्याच्या देठांचा भाग पाण्याने भरलेल्या ग्लास किंवा बरणीत ठेवा. ही पद्धत फुलं ताजी ठेवण्यासारखीच आहे. हा ग्लास फ्रिजमध्ये ठेवा आणि दर दोन दिवसांनी पाणी बदला. त्यामुळे पुदिन्याची पाने हिरवीगार आणि ताजी राहतात.

**फ्रीजरचा वापर करा**

जर तुम्ही रोज पुदिना वापरत नसाल, तर तो फ्रीजरमध्ये साठवून ठेवू शकता. त्यासाठी पुदिन्याची पाने वेगळी करा, ती आईस ट्रेमध्ये ठेवा आणि त्यावर पाणी घालून गोठवा. गरजेनुसार हे बर्फाचे तुकडे चटणी, पेये किंवा इतर पदार्थांमध्ये वापरता येतात. यामुळे पुदिन्याचा स्वाद आणि सुगंध बराच काळ टिकून राहतो.

**या चुका टाळा**

पुदिना कधीही ओल्या प्लास्टिकच्या पिशवीत बंद करून ठेवू नका. तसेच फ्रिजमधील अतिशय थंड भागातही ठेवू नका. जास्त ओलावा आणि जास्त थंडी या दोन्ही गोष्टी पुदिन्याची गुणवत्ता खराब करतात. याशिवाय पिवळी पडलेली किंवा खराब झालेली पाने आधीच वेगळी काढून टाका. कारण अशी पाने इतर ताजी पानेही लवकर खराब करू शकतात. या पद्धतीने पुदिना जास्त काळ ताजा राहतो आणि वारंवार बाजारातून आणण्याची गरजही पडत नाही. त्यामुळे या सोप्या टिप्स वापरून उन्हाळ्यात पुदिन्याचा ताजेपणा आणि सुगंध टिकवून ठेवता येईल.

# संघर्ष, जनविश्वास आणि विकासाचा अखंड प्रवास : संभाजीराव पाटील निलंगेकर

राजकारणात अनेक नेते येतात, सत्ता मिळवतात आणि काळाच्या ओघात विस्मृतीत जातात. मात्र काही व्यक्तिमत्त्वे अशी असतात की त्यांचे नाव केवळ राजकारणापुरते मर्यादित राहत नाही, तर ते जनतेच्या आशा-आकांक्षांशी जोडले जाते. निलंगा तालुका, लातूर जिल्हा आणि मराठवाड्याच्या राजकीय क्षितिजावर असेच एक नाव म्हणजे माजी मंत्री तथा आमदार संभाजीराव पाटील निलंगेकर.



आज त्यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांच्या राजकीय आणि सामाजिक प्रवासाकडे पाहिले तर तो केवळ एका नेत्याचा प्रवास वाटत नाही, तर तो संघर्ष, जिद्द, लोकांवरील विश्वास आणि विकासासाठी केलेल्या सातत्यपूर्ण प्रयत्नांची प्रेरणादायी कहाणी वाटते.

संभाजीराव पाटील निलंगेकर यांना राजकारणाचा वारसा लाभला, हे खरे असले तरी स्वतःचे नेतृत्व निर्माण करण्यासाठी त्यांनी खडतर संघर्षाचा मार्ग स्वीकारला. कोणत्याही प्रकारचा बडेजाव, दिखाऊपणा किंवा पदाचा गर्व न बाळगता त्यांनी सर्वसामान्य माणसाच्या प्रश्नांना आपल्या राजकारणाचा केंद्रबिंदू बनवले. शेतकरी, शेतमजूर, बेरोजगार युवक, महिला आणि ग्रामीण भागातील सामान्य नागरिक यांच्या समस्या समजून घेण्यासाठी त्यांनी गावोगावी फिरत लोकांशी संवाद साधला.

राजकारणात अनेकजण सत्ता मिळाल्यानंतर जनतेपासून दूर जातात. मात्र संभाजीराव पाटील निलंगेकर यांची ओळख आजही जमिनीवर राहणाऱ्या नेतृत्वाची आहे. कार्यकर्त्यांच्या सुख-दुःखात सहभागी होणे, रात्री-अपरात्री फोन उचलणे, एखाद्या शेतकऱ्याच्या अडचणीला प्रतिसाद देणे किंवा एखाद्या गरजू कुटुंबाला मदतीचा हात देणे, हे त्यांच्या स्वभावाचा भाग बनले आहे.

त्यांच्या राजकीय कारकिर्दीची सुरुवात निलंगा ग्रामविकास आघाडीच्या माध्यमातून झाली. त्या काळात या भागातील अनेक प्रश्न प्रलंबित होते. शेतकऱ्यांना योग्य भाव, युवकांना रोजगार, रस्ते, पाणी, वीज यांसारख्या मूलभूत सुविधांसाठी लोकांना संघर्ष करावा लागत होता. अशा वेळी संभाजीराव पाटील निलंगेकर यांनी आंदोलनाचा मार्ग स्वीकारला. ऊस उत्पादक शेतकऱ्यांचे प्रश्न असोत, सोयाबीन उत्पादकांचे प्रश्न असोत किंवा सर्वसामान्य नागरिकांच्या अडचणी असोत, त्यांनी प्रत्येक वेळी रस्त्यावर उतरून जनतेच्या बाजूने भूमिका घेतली.

याच संघर्षशील वृत्तीमुळे लोकांचा त्यांच्यावर विश्वास वाढत गेला. लोकांना त्यांच्यामध्ये केवळ नेता नव्हे, तर आपल्या हक्कासाठी लढणारा प्रतिनिधी दिसू लागला. परिणामी निलंगा विधानसभा मतदारसंघाने त्यांना पुन्हा पुन्हा निवडून देत आपला विश्वास व्यक्त केला.

महाराष्ट्राच्या राजकारणात अनेक दशकांपासून काँग्रेसचे वर्चस्व असलेल्या लातूर जिल्ह्यात भाजपचे संघटन मजबूत करण्यामध्ये त्यांचे योगदान विशेष मानले जाते. लातूर महानगरपालिका, जिल्हा परिषद आणि विविध स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये भाजपला यश मिळवून देण्यासाठी त्यांनी मोठे परिश्रम घेतले. सामान्य कार्यकर्त्यांना संधी देण्याची त्यांची भूमिका असल्यामुळे अनेक नव्या चेहऱ्यांना नेतृत्वाची संधी मिळाली.

विकासाच्या बाबतीत बोलायचे झाले तर संभाजीराव पाटील निलंगेकर यांनी केवळ राजकीय भाषणे न करता प्रत्यक्ष कामांवर भर दिला. जलयुक्त शिवार अभियानाच्या माध्यमातून जलसंधारणाची मोठी चळवळ उभारली. लोकसहभागातून नद्या, नाले, ओढे यांचे खोलीकरण व रुंदीकरण करण्यात आले. मराठवाड्यासारख्या दुष्काळी भागात पाण्याचा प्रत्येक थेंब जमिनीत मुरला पाहिजे, हा त्यांचा विचार होता.

निलंगा शहरासाठी २४ तास पाणीपुरवठा योजना मंजूर करून ती पूर्णत्वास नेणे हे त्यांच्या कार्यकाळातील एक महत्त्वाचे यश मानले जाते. अनेक वर्षे पाणीटंचाईचा सामना करणाऱ्या नागरिकांना यामुळे मोठा दिलासा मिळाला. महाराष्ट्रातील 'क' वर्गाच्या नगरपालिकांमध्ये असा उपक्रम राबवणारे निलंगा शहर विशेष ठरले.


निलंगा शहराच्या विकासामध्येही त्यांचे योगदान लक्षणीय आहे. भव्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक, अभ्यासिका, सांस्कृतिक सभागृहे, विविध समाजांसाठी समाजमंदिरे, अल्पसंख्याक समाजासाठी शादीखाना अशा अनेक सुविधा उपलब्ध करून देण्यात त्यांनी पुढाकार घेतला.

शेतकऱ्यांच्या आर्थिक उन्नतीसाठी अंबुलगा सहकारी साखर कारखान्याचे पुनरुज्जीवन हे त्यांच्या कार्यातील एक महत्त्वाचे पर्व ठरले. अनेक वर्षे बंद पडलेल्या कारखान्याला पुन्हा सुरू करून त्यांनी हजारो ऊस उत्पादक शेतकऱ्यांना नवसंजीवनी दिली. त्यानंतर इथेनॉल आणि सीएनजी प्रकल्पांच्या माध्यमातून ग्रामीण भागात उद्योगविकासाचे नवे दालन खुले करण्याचा प्रयत्न केला.

आजच्या काळात नेतृत्वाची खरी परीक्षा विकासकामे, जनतेशी असलेली नाळ आणि संकटसमयी उभे राहण्याच्या क्षमतेवर होते. या सर्व निकषांवर संभाजीराव पाटील निलंगेकर यांनी स्वतःची स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे. त्यांच्या व्यक्तिमत्त्वात कर्मयोगी डॉ. शिवाजीराव पाटील निलंगेकर यांच्या विकासदृष्टीचा वारसा आणि आधुनिक काळातील गरजांची जाण यांचा सुंदर संगम दिसून येतो.

वाढदिवस हा केवळ शुभेच्छा देण्याचा दिवस नसतो, तर एखाद्या व्यक्तीच्या कार्याचा गौरव करण्याची संधी असते. आज संभाजीराव पाटील निलंगेकर यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांच्या आतापर्यंतच्या कार्याचा आढावा घेताना एक गोष्ट निश्चितपणे जाणवते-जनतेचा विश्वास, कार्यकर्त्यांचे प्रेम आणि विकासाची तळमळ हीच त्यांच्या राजकीय प्रवासाची खरी ताकद आहे.

आगामी काळातही त्यांच्या नेतृत्वातून निलंगा, लातूर आणि मराठवाड्याच्या विकासाला नवी दिशा मिळो, जनतेच्या अपेक्षा पूर्ण होवोत आणि त्यांच्या कार्याला अधिक यश लाभो, हीच वाढदिवसानिमित्त मनःपूर्वक सदिच्छा.



**- विजय मुरलीधर होगले**
**जनसेवा संपर्क कार्यालय निलंगा**
**मो नं ९८२२२०६५९५**

अमेरिकेच्या हल्लयात भारतीयांची हत्या होण्याचा मुद्दा मोदी यांनी उपस्थित केला असला तरी ट्रम्प यांनी त्यास फार महत्त्व दिले नसल्याचे दिसत आहे. 'मैत्रीचे प्रदर्शन' एवढाच या चर्चेचा मथितार्थ आहे.
जगभर ज्याचा गाजावाजा झाला तो अमेरिका आणि इराण यांच्यातील 'शांतता करार' म्हणजे प्रत्यक्षात दोन देशांतील 'सहमती' किंवा 'समझोता' ठरला. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी फ्रान्समध्ये व्हर्सायिच्या राजप्रासादात त्याच्या प्रतीवर स्वा-क्षरी केली. मग त्याची छायाप्रत इराणला पाठवली गेली आणि त्याच्या मुद्रित प्रतीवर इराणचे अध्यक्ष मसूद पेझेश्कियान यांनी स्वाक्षरी केली. दोघांतील 'अंतिम करार' दोन महिन्यांत पूर्ण करण्याचे त्यानुसार ठरले आहे. अमेरिका, इराण व त्यांची मित्र राष्ट्रे सर्व आघाड्यांवरील लष्करी कारवाई थांबवतील हा ताज्या सहमतीचा महत्त्वाचा भाग आहे. 'सर्व' आघाड्यांमध्ये लेबाननचाही समावेश आहे. या समझोत्याने खनिज तेलाची निर्यात



वधी पिंपे तेल भरलेली जहाजे इराणमधून बाहेर पडली असे वृत्त पाश्चात्त्य माध्यमांनी दिले आहे. आपली आयात व निर्यात सुरळीत होण्यास जगातील सर्व देश प्राधान्य देत आहेत. त्यामुळे होर्मुझची सामुद्रधुनी खुली होणे सर्वांसाठी महत्त्वाचे आहे. त्यात भारतही समाविष्ट आहेच. तेल वाहतूक सुरू झाली तरी त्याचे दर युद्धपूर्वपातळीवर येण्यास बराच काळ लागेल असा इशारा या क्षेत्रातील तज्ज्ञांनी हा कथित करार होण्यापूर्वीच दिला होता. भारतातील तेल वितरण कंपन्यादेखील त्यांचा तोटा भरून निघेपर्यंत इंधनाचे दर कमी करण्याची शक्यता नाही. त्यामुळे पेट्रोल व डीझेल किंवा स्वयंपाकाचा गॅस आणखी काही काळ महाग दराने घेण्याची तयारी भारतीयांना ठेवावी लागेल. या कराराचा उल्लेख ट्रम्प अनेक दिवस 'डील' असा करत होते. 'डील' हा शब्द अमेरिकन व्यवस्थेत व्यापक अर्थाने वापरला जातो. दोन व्यक्तींमधील साधी देवाण-

# 'बरेच करार' अजून लांब आहे

करण्यास इराणला मुभा मिळाली आहे. होर्मुझची सामुद्रधुनी व इतरत्र केलेली नाकेबंदी अमेरिका मागे घेणार आहे. त्या साठी तीस दिवसांची मर्यादा ठरली आहे. इराणचे आखात (पर्शियन गल्फ) ते ओमानचा समुद्र या पट्ट्यातून व्यापारी जहाजांची सुरक्षित वाहतूक व्हावी याची काळजी इराण घेणार आहे. त्यासाठी शुल्क न आकारण्यास इराण तयार झाला आहे. होर्मुझच्या सामुद्र धुनीच्या व्यवस्थापनाचा निर्णय इराण आणि ओमान घेणार आहेत. या तात्पुरत्या किंवा हंगामी समझोत्याने जगातील सर्व देशांनी सुटकेचा नि:श्वास सोडला असेल.
इराणचा फायदा जास्त आपण आण्विक अस्त्रे विकत घेणार नाही आणि विकसितही करणार नाही अशी ग्वाही या समझोत्यानुसार इराणने दिली आहे. इराणकडे संपृक्त युरेनियम आहे. त्याची विल्हेवाट लावण्यासाठी दोन्ही देश एक पद्धती उभयपक्षी सहमतीने तयार करणार आहेत. इराणच्या आण्विक गरजांशी संबंधित बाबींवर दोन्ही देश चर्चा करणार आहेत. या चर्चेसाठी उभयपक्षी समाधानकारक चौकट ठरवण्यावर एकमत झाले आहे. इराणवरील सर्व निर्बंध हटवण्यास अमेरिकेने मान्यता दिली आहे. त्यामुळे अब्जावधी डॉलर्सचा गोठवलेला निधी इराणला परत मिळेल. इराणच्या फेर उभारणीसाठी ३०० अब्ज डॉलर्सची योजना अमेरिका व तिचे आखातातील मित्र देश आखणार आहेत. अमेरिकेने इराणवर हल्ला का केला होता हा प्रश्न हा समझोता बघून पडतो. समझोत्यावर स्वाक्षर्या होताच लक्षा-

घेवाण असो किंवा मोठ्या कंपन्यांचे व्यवहार असोत अथवा द्वीपक्षीय किंवा बहुराष्ट्रीय करार असोत; त्यांना अमेरिकन 'डील' हाच शब्द वा-परतात. अंतिम करार करण्यासाठी दोन्ही देशांत स्वित्झर्लंडमध्ये चर्चा सुरू झाली आहे. कतारसह अनेक आखाती देश त्यात सहभागी होत आहेत. मध्यस्थांपैकी एक पाकिस्तानही आहे ही बाब भारतासाठी राजकीय दृष्ट्या अडचणीची आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना ट्रम्प मित्र म्हणतात तरी पाकिस्तान त्यांना जवळचा वाटतो असा त्याचा अर्थ आहे. अमेरिका व भारत यांच्यातील व्यापार करारात फार प्रगती झालेली नाही हे येथे लक्षात घेतले पाहिजे. या हंगामी का होईना पण झालेल्या समझोत्यामुळे अमेरिका-इराण युद्ध सध्या थांबले हे महत्त्व-ाचे आहे. इस्रायलने हा समझोता अमान्य केल्याने युद्ध पूर्ण थांबले असे म्हणता येणार नाही. अंतिम करार मुदतीत व्हावा व शांतता नांदावी ही जगाची इच्छा आहे.

# जागतिक योग दिन २०२६ ची संकल्पना



निरोगी वार्धक्यासाठी योगफ दीर्घायुष्य आणि आरोग्यासाठी भारताच्या सर्वांगीण दृष्टिकोनावर प्रकाश टाकते.योग सन्मानाने आणि निरोगीपणे वृद्ध होण्याची कला शिकवतो: केंद्रीय मंत्री श्री प्रतापराव जाधव.
गेल्या दशकात योग आणि निरोगी वृद्धत्वावरील जागतिक वैज्ञानिक अभ्यासात लक्षणीय वाढ झाली आहे.
२१ जून, २०२६ रोजी साजरा होणाऱ्या १२ व्या आंतरराष्ट्रीय योग दिनाची (खउ्ध) संकल्पना, निरोगी वार्धक्यासाठी योग , ही शारीरिक, मानसिक आणि भावनिक आरोग्याला चालना देणारा एक समग्र दृष्टिकोन म्हणून योगाला मिळत असलेल्या वाढत्या जागतिक मान्यतेचे प्रतिबिंब आहे. भारताच्या प्राचीन ज्ञानात रुजलेला आणि जगभरात स्वीकारला गेलेला योग, निरोगी आणि सक्रिय जीवन जगण्याचा एक विश्वासार्ह मार्ग म्हणून उदयास आला आहे. ही संकल्पना चैतन्य, लवचिकता आणि स्वातंत्र्य वाढवण्यामधील योगाच्या परिवर्तनीय क्षमतेवर प्रकाश टाकते, तसेच प्रतिबंधात्मक आरोग्यसेवा आणि सर्वांगीण आरोग्याचा आधारस्तंभ म्हणून योगाच्या भूमिकेला बळकटी देते.या संकल्पनेच्या महत्त्वावर बोलताना, आयुष मंत्रालयाचे स्वतंत्र कार्यभार असलेले केंद्रीय राज्यमंत्री आणि आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री, श्री प्रतापराव जाधव म्हणाले, या वर्षीच्या आंतरराष्ट्रीय योग दिनाची ङ्गनिरोगी वार्धक्यासाठी योगफ ही संकल्पना आजही अत्यंत समर्पक आहे. आयुर्मान सतत वाढत असल्याने, आपण सन्मानाने आणि निरोगीपणे वृद्ध होण्याची कला शिकणे अत्यावश्यक आहे. ही संकल्पना भारताच्या प्राचीन संस्कृतीत सुंदरपणे दिसून येते, जिथे आपल्या ऋषीमुनींनी आणि योगींनी योग आणि आध्यात्मिक शिस्तीच्या सामर्थ्याने दीर्घायुष्य आणि उत्तम आरोग्य टिकवून ठेवले. हा विषय केवळ आयुर्मानच नव्हे, तर ङ्गआरोग्यकाळफ - म्हणजेच उत्तम आरोग्यात घालवलेला आयुष्याचा कालावधी - वाढवण्याच्या गरजेकडे लक्ष वेधतो.
शारीरिक आसने,

श्वासोच्छ्वासाचे व्यायाम, ध्यान आणि सजगता यांच्या संयोगातून, योग वृद्धत्वाच्या संपूर्ण प्रक्रियेदरम्यान गतिशीलता, मानसिक स्व-ास्थ्य आणि भावनिक लवचिकता टिकवून ठेवण्यासाठी एक व्यापक दृष्टिकोन प्रदान करतो.
वाढती वैज्ञानिक मान्यता-निरोगी वृद्धत्वात योगाच्या भूमिकेकडे जागतिक वैज्ञानिक समुदायाकडून वाढते लक्ष दिले जात आहे. पबमेड सेंट्रलवर उपलब्ध असलेल्या माहितीनुसार, गेल्या दशकात निरोगी वृद्धत्वासाठी योग या विषयाशी संबंधित विद्वत्तापूर्ण प्रकाशनांमध्ये लक्षणीय वाढ झाली आहे.२०१४ मध्ये या विषयावर केवळ १८३ शोधनिबंध प्रकाशित झाले होते, तर २०२५ पर्यंत ही संख्या १,२०७ प्रकाशनांपर्यंत वाढली. २०२० मध्ये संशोधनाची संख्या ५०० प्रकाशनांच्या पुढे गेली आणि त्यात सातत्याने वाढ होत राहिली आहे, जे वयाशी संबंधित शारीरिक आणि मानसिक आव्हानांना सामोरे जाण्यात योगाच्या भूमिकेबद्दल वाढत्या वैज्ञानिक आवडीचे द्योतक आहे.
जागतिक योग दिन २०२६ ची

संकल्पना मनिरोगी वार्धक्यासाठी योगफ दीर्घायुष्य आणि आरोग्यासाठी भारताच्या सर्वांगीण दृष्टिकोनावर प्रकाश टाकते.
योग सन्मानाने आणि निरोगीपणे वृद्ध होण्याची कला शिकवतो: केंद्रीय मंत्री श्री प्रतापराव जाधव.गेल्या दशकात योग आणि निरोगी वृद्धत्वावरील जागतिक वैज्ञानिक अभ्यासात लक्षणीय वाढ झाली आहे.पोस्ट करण्याची वेळ: ०१ जून २०२६ सायंकाळी ५:५० वाजता, पीआयबी दिल्ली द्वारे २१ जून, २०२६ रोजी साजरा होणाऱ्या १२ व्या आंतरराष्ट्रीय योग दिनाची (खउ्ध) संकल्पना, निरोगी वार्धक्यासाठी योग , ही शारीरिक, मानसिक आणि भावनिक आरोग्याला चालना देणारा एक समग्र दृष्टिकोन म्हणून योगाला मिळत असलेल्या वाढत्या जागतिक मान्यतेचे प्रतिबिंब आहे. भारताच्या प्राचीन ज्ञानात रुजलेला आणि जगभरात स्वीकारला गेलेला योग, निरोगी आणि सक्रिय जीवन जगण्याचा एक विश्वासार्ह मार्ग म्हणून उदयास आला आहे. ही संकल्पना चैतन्य, लवचिकता आणि स्वातंत्र्य वाढवण्यामधील योगाच्या परिवर्तनीय क्षमतेवर प्रकाश टाकते, तसेच प्रतिबंधात्मक आरोग्यसेवा आणि सर्वांगीण आरोग्याचा आधारस्तंभ म्हणून योगाच्या भूमिकेला बळकटी देते.या संकल्पनेच्या महत्त्वावर बोलताना, आयुष मंत्रालयाचे स्वतंत्र कार्यभार असलेले केंद्रीय राज्यमंत्री आणि आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री, श्री प्रतापराव जाधव म्हणाले, या वर्षीच्या आंतरराष्ट्रीय योग दिनाची ङ्गनिरोगी वार्धक्यासाठी योगफ ही संकल्पना आजही अत्यंत समर्पक आहे.

# घरामध्ये भरभराट आणि समृद्धी नांदावी या करिता काही वास्तू टिप्स

घर असो, वा ऑफिस वास्तूशास्त्राचे प्रभाव प्रत्येक व्यक्तीच्या जीवनावर होतच असतात. यातील काही प्रभाव अतिशय शुभ फल देणारे, तर काही अशुभ फल देण-ारे असतात. म्हणूनच घराची रचना करताना किंवा घरामध्ये वस्तूंची मांडणी करताना वास्तूशास्त्राचे काही महत्व-ाचे नियम लक्षात घेणे अगत्याचे ठरते. हे नियम लक्षात घेऊन जर घराची वास्तूरचना आणि घरातील वस्तूंची मांडणी केली गेली, तर घरामध्ये नेहमी सकारात्मक वातावरण आणि सुख समृद्धी नांदते. घरामधील तिजोरी किंवा महत्वाचे जिन्नस ठेवण्याच्या कपाटाच्या वर शक्यतो इतर अवजड सामान ठेवलेले नसावे. त्याचबरोबर ज्या ठिकाणी धनसंचय केला जातो, त्या ठिकाणी विवादास्पद संपत्तीशी निगडीत कागदपत्रे ठेवणेही वास्तूशास्त्राच्या अनुसार अशुभ मानले गेले आहे. घरामध्ये ज्या ठिकाणी वास्तूदोष निर्माण झाला असेल त्या ठिकाणी शंख ठेऊन त्याची नेमाने पूजा केल्याने वास्तूदोष दूर होतो. जर घरामध्ये शंख नसेल, तर दररोज नित्याची पूजा आटोपल्यानंतर वास्तुदोष असलेल्या ठिकाणी घंटानाद केल्याने वास्तुदोष दूर होण्यास मदत होते. घंटानादामुळे घरातील नकारात्मक उर्जाही नष्ट होते. हिंदू धर्मामध्ये तुळशीला मोठे महत्व आहे. तुळस ही केवळ धार्मिक दृष्ट्याच नाही तर आरोग्याच्या दृष्टीने देखील महत्वपूर्ण औषधी आहे. त्यामुळे दररोज संध्याकाळी तुळशीपाशी दिवा लावण्याची प्रथा आपल्याकडे फार प्राचीन काळापासून रूढ आहे. यामुळे घरातील वास्तुदोष आणि नकारात्मक शक्ती नष्ट होत असल्याचे म्हटले जाते. घरामध्ये असलेली सर्व घड्याळे चालू स्थितीमध्ये असणे इष्ट आहे. जर एखादे घड्याळ बंद पडलेच असेल, तर ते त्वरित सुरु करवून घ्यावे. त्याचप्रमाणे घराम ध्ये तुटलेले आरसे किंवा तडा गेलेल्या काचेच्या वस्तूही साठवून ठेऊ नयेत.



शयनकक्षातील पलंगाच्या खाली पादत्राणे किंवा इतर अडगळीचे सामान नसावे. पलंगाच्या खाली अडगळ ठेवल्याने सकारात्मक शक्तीचे योग्य रीतीने संचरण होऊ शकत नाही. या खोलीमध्ये आपले ड्रेसिंग टेबल असले, तर त्याचा आरसा पलंगाच्या बरोबर समोर नसावा. तसेच कोणत्याही खोलीमध्ये दरवाजाच्या एकदम समोरही आरसा ठेवला जाऊ नये. घरातील देवघर उत्तराभिमुख किंवा पूर्वाभिमुख ठेवलेले असावे. तसेच देवघर जमिनीवर न ठेवता आपल्या नजरेच्या समोर (आय लेव्हलवर) असावे. देवघराच्या वर कोणत्याही प्रकारचे सामान रचून ठेऊ नये. वास्तूशास्त्राच्या अनुसार रात्रीच्या वेळी खरकटी भांडी स्वयंपाकघरामध्ये पसरून न ठेवता व्यवस्थित एकत्र करून ठेवली जावीत. स्वयंपाकघर अस्ताव्यस्त असेल तर त्या घरामध्ये सतत आर्थिक अडचणी येऊ लागतात आणि घरातल्या मंडळींच्या आरोग्यासंबंधी तक्रारी वारंवार उद्भवू लागत असल्याचे ही वास्तूशास्त्र सांगते.

## १ Doctor Tips सल्ला डॉक्टरचा

परिस्थितीत शिंक किंवा खोकला आल्यावर लघवी होऊन जाते.
कारणे-स्नायूंचा कमकुवतपणा




महिलांमध्ये सरत्या वयानुसार हा आजार होऊ शकतो. साध-ारणपणे वयाच्या ३० ते ३५ वर्षानंतर हा त्रास उद्भव-तो. काही महिलांमध्ये वृद्धत्वानुसार हा आजार संभवतो. बाळास जन्म दिल्यावर अनेक स्त्रियांच्या खालील शरीराच्या स्नायू कमकुवत होतात. कारण बाळाच्या जन्माच्या वेळीस हे स्नायू जास्त ताणले जातात. जेव्हा आई कमजोर आणि मूळ सशक्त असल्यास असे होणे अधिक संभवते. या शिवाय स्थूलपणा, मधुमेह असल्यास हा त्रास संभवतो.

## २ Joke विनोद




**मुलगा : आई, नव्या ट्युबमधील टूथपेस्ट किती लांब होते माहीत आहे.**
**आई : नाही, तू सांग.**
**मुलगा : गॅलरीत पिळायला सुरुवात केली तर बाथरूमपर्यंत येते. एवढीच लांब आहे.**

## ३ Message संदेश




Santa: tumhaari wife kyu hamesha gussa rahti hai?
Banta: maine galti se use bola tha ki “tum gusse main bhi bahut khoob lagti ho”


## ४ Thought सुविचार



गुलाब देणाऱ्या हातांना त्याचा सुगंध चिकटल्याशिवाय राहात नाही.
- बाबा आमटे

**संस्कृत सुभाषित**
अनिर्वेद: श्रियो मूलं लाभस्य च शुभस्य च।।
(उद्योगपर्व, अध्याय ३९, ेक ५९, महाभारत)
अर्थ - लक्ष्मीचे, लाभाचे आणि कल्याणाचे मूळ सतत उद्योग करणे हे आहे.

# मनोरंजक महाशब्दकोड्यांचा समाचार



## आडवे शब्द

१. गणपतीच्या रूपाचे आरतीमधील वर्णन
७. छोटी लढाई
१०. समूह, जथा
११. नड
१२. त्रासदायक
१४. चिखलाची जमीन
१६. डोळ्यात पाणी आणणारा कंद
१७. बेचव
१९. हिंदीत वागण्यचे वळण
२०. भांडणे सोडविणारा मध्यस्थ
२१. पोरका
२२. बाळभाषेत ईश्वर
२३. आईवडिलांचे छत्र असलेला
२४. कमळ
२५. युवक
२७. किंमत
२८. हुक्की, लहर
२९. कहाणी
३०. दुर्दशा
३२. उत्कर्षाचा काळ
३५. सांघिक व्यायाम
३७. मान देण्यास योग्य असा
३९. सापाची एक जात
४०. दुसऱ्याच्या मनातील भाव ओळखणारा
४२. आठवण
४३. रामाला बोरे देणारी
४४. सारखा
४६. आई
४८. रामचरित मानस लिहिणारे हिंदी संत
५०. साग्रसंगीत भोजनाची खाशी पंगत
५३. किंमत
५५. मूल
५७. उणीव भरून काढणारी
५८. छोटासा
६१. पिकाचा पावसाळी हंगाम
६२. सुगंध
६३. रियाझ
६४. हाताचा उपडा पंजा
६५. सरोवर
६६. ठाणवई
६७. प्रजा
६८. 'माई' जोडल्यास विठ्ठलपत्नीचे नाव
७०. कोणत्याही क्षेत्रातील प्रतिभावंत
७२. मांडणी करणे, एकावर एक ठेवणे
७४. वर्दळ
७५. पांढरशुभ्र (हिंदी)
७८. खांद्यावरून घ्यायचे वस्त्र
७९. कठीण प्रसंग
८०. होडके, नावाडी

## उभे शब्द

२. डोंगर खोदून केलेला रस्ता
३. प्रत्येक
४. चंद्र
५. किंचित तांबड्या रंगाचे
६. गोष्ट फुगवून सांगणे (वाक्प्रचार)
७. स्वच्छ, चमकणारे
८. मोगऱ्याची मोठ्या पाकळ्यांची जात
९. झोक, वळण
१०. एकमेकांवर काम ढकलणे, चुकवाचुकव
१३. अस्थिर संपत्ती
१५. पाकळी, तुकडी
१६. बायको
१८. पौराणिक अश्ववाहन
२१. अगम्य
२३. उत्सव
२४. कारण
२६. तात्पुरते रुसणे
२७. भारताचा राष्ट्रीय पक्षी
२८. मानसिक धक्का (हिंदी)
३०. पाडाव, पडणे
३१. खराब, वाईट
३३. घोडा
३४. मुद्यावरून गुद्यावर येणे
३६. संगीतातील एक राग
३८. अनावश्यक
४१. अत्तरासाठी प्रसिद्ध उत्तर प्रदेशातील शहर
४४. नेहमी
४५. नमुनेदार
४६. सरकारी जमिनीची व्यवस्था पाहणारा
४७. अपघात, दुर्दैवी प्रसंग (हिंदी)
४९. लवकुशाची आई
५०. पुराणकालीन पर्वत, दंड लावल्यास पाठीचा कणा
५१. चंचल, बेशिस्त
५२. शांतता
५४. प्रमाणपत्र, उदाहरण
५६. सत्व
५९. चर, खंदक
६०. नवारीने बाज विणणे
६२. फुल, पुष्प
६३. एकरूपता
६५. बोबडी वळणे
६९. उंचीने कमी
७१. तमाशातील ठसकेबाज नृत्यगीत
७३. ओरखडा
७४अ. कर्ता विचारणारा प्रश्न
७६. रिंगण
७७. औषध

## आडवे उत्तर

१.लंबोदर पितांबर ७.चकमक १०.टोळी ११.गरज १२.जाचक १४.दलदल १६.कांदा १७.नीरस १९.चालचलन २०.लवाद २१.अनाथ २२.बाप्पा २३.सनाथ २४.सरोज २५.तरूण २७.मोल २८.सणक २९.कथा ३०.परवड ३२.लहरबहर ३५.कवायत ३७.माननीय ३९.मणेर ४०.मनकवडा ४२.सय ४३.शबरी ४४.समान ४६.माता ४८.तुल-सीदास ५०.मेजवानी ५३.दरदाम ५५.लेकरू ५७.भर ५८.लहानसा ६१.खरीप ६२.सुवास ६३.सराव ६४.तळवा ६५.तलाव ६६.समई ६७.रयत ६८.रखु ७०.कलाकार ७२.रचणे ७४.ये-जा ७५.सफेद ७८.उपरणे ७९.आणीबाणी ८०.तारवा

## उभे उत्तर

२.बोगदा ३.दर ४.रजनीनाथ ५.तांबूस ६.रजाचा गज करणे ७.चकचकीत ८.मदनबाण ९.कल १०.टोलवाटोलव १३.चल १५.दल १६.कांता १८.रथ २१.अनाकलनीय २३.सण २४.सबब २६.रुसवा २७.मोर २८.सदमा ३०.पतन ३१.डबडा ३३.हय ३४.हमरीतुम रीवर येणे ३६.यमन ३८.नसता ४१.कन्नोज ४४.सदा ४५.मासलेवाईक ४६.मामलतदार ४७.हादसा ४९.सीता ५०.मेरू ५१.वाभरा ५२.नीरवता ५४.दाखला ५६.कस ५९.हाळ ६०.नवारणे ६२.सुम ६३.समरसता ६५.ततपप ६९.खुजा ७१.लावणी ७३.चरा ७४अ.कोणी ७६.फेर ७७.दवा

## धनंजय औंढेकर महावितरणच्या संचालक (संचालन) पदी रुजूपदी रुजू



**लातूर/प्रतिनिधी:** महावितरण कंपनीचे संचालक (संचालन) म्हणून श्री. धनंजय औंढेकर यांनी गुरूवारी (दि. १८) कार्यभार स्वीकारला. त्यांची या पदावर थेट भरती प्रक्रियेतून निवड झाली आहे. याआधी ते कार्यकारी संचालक (वितरण/प्रकल्प) म्हणून कार्यरत होते. श्री. औंढेकर गेल्या २९ वर्षांपासून महावितरणमध्ये विविध पदांवर कार्यरत आहेत.

नवनियुक्त संचालक (संचालन) श्री. धनंजय औंढेकर हे मूळचे औंढा नागनाथचे (जि. हिंगोली) आहे. त्यांनी विद्युत अभियांत्रिकी पदवी तसेच एमबीए (फायनान्स), एनर्जी ऑडिटर, नवी दिल्ली येथून ॲडव्हॉन्स सर्टिफिकेट इन पॉवर डिस्ट्रीब्यूशन मॅनेजमेंट अभ्यासक्रम विशेष प्रावीण्यासह पूर्ण केला आहे. संचालक श्री. औंढेकर हे १९९७ मध्ये तत्कालिन महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळामध्ये कनिष्ठ अभियंता म्हणून माजलगाव (जि. बीड) येथे रूजू झाले. सन २००६ मध्ये थेट निवड प्रक्रियेतून त्यांची कार्यकारी अभियंता पदी निवड झाली. त्यानंतर २०१६ मध्ये थेट निवड प्रक्रियेतून अधीक्षक अभियंता तर २०१९ मध्ये पदोन्नतीने मुख्य अभियंता पदी निवड झाली. या विविध पदांवर श्री. औंढेकर यांनी बीड, परभणी, छत्रपती संभाजीनगर, नाशिक, पुणे, सोलापूर, कल्याण, मुंबई मुख्यालयात काम केले आहे.

संचालक (संचालन) श्री. औंढेकर हे २०२४ पासून कार्यकारी संचालक म्हणून कार्यरत होते. त्यांच्या या कार्यकाळात महावितरणने मागेल त्याला सौर कृषिपंपमध्ये देशात प्रथम स्थान मिळवले. एकाच महिन्यात ४५ हजार ९११ सौर कृषिपंप कार्यान्वित करण्याचा जागतिक विक्रम केल्याचे गिनीज वर्ल्ड रेकॉर्डने जाहीर केले आहे. प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेत घराच्या छतावरील सौर प्रकल्पांमध्ये देशात द्वितीय स्थान पटकावले. या योजनेसाठी महावितरणने देशात सर्वप्रथम फेसलेस-पेपरलेस ही ऑनलाइन सुविधा सुरु केली. नवीन वीजजोडणी, ग्राहक नावात बदल आणि वीजभार वाढीच्या ऑनलाइन अर्जांना स्वयंचलित मंजुरीची प्रक्रिया सुरु केली. यामध्ये संचालक श्री. औंढेकर यांचे मोठे योगदान आहे.'अपर मुख्य सचिव (ऊर्जा) आभा शुक्ला आणि मा. मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव तथा महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. लोकेश चंद्र यांच्या मार्गदर्शनात सांघिक कामगिरीतून कंपनीला अधिक सक्षम, ग्राहकस्नेही व हरित ऊर्जेकडे नेण्यास आणखी प्राधान्य देण्यात येईल. नवीन वीजजोडणीची प्रक्रिया फेसलेस-पेपरलेस म्हणजे पूर्णतः ऑनलाईन करण्यात येईल. सुरळीत वीजपुरवठा, दर्जेदार ग्राहकसेवा, वीज हानीमध्ये घट आणि महसूलवाढ हे मुख्य ध्येय आहे', असे महावितरणचे नवनियुक्त संचालक (संचालन) श्री. धनंजय औंढेकर यांनी सांगितले.

## आ.संभाजीराव पाटील निलंगेकर यांचा वाढदिवस विविध सामाजिक उपक्रमांच्या माध्यमातून साजरा होणार



**निलंगा /आयुब बागवान :** दरवर्षीप्रमाणे याही वर्षी लातूर जिल्ह्याचे माजी पालक मंत्री तथा निलंगा विधानसभेचे लोकप्रिय आमदार श्री. संभाजीराव पाटील निलंगेकर साहेब यांच्या वाढदिवस मोठ्या प्रमाणात साजरा करण्याचा संकल्प कार्यकर्त्यांनी केला होता पण मा.श्री. संभाजीभैया पाटील निलंगेकर साहेबांनी या वर्षीची पावसाची परिस्थिती पाहता शेतकऱ्यांना भेडसावणाऱ्या दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर आपला वाढदिवस साध्या व सामाजिक उपक्रमाच्या माध्यमातून साजरा करावा असा संदेश दिल्यामुळे यावर्षीचा वाढदिवस साध्या पद्धतीने व सामाजिक उपक्रमाने साजरा केला जाणार आहे. यात हलगरा जिल्हा परिषद गटातील सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळा मौजे माकणी थोर येथे सकाळी १०:०० वाजता आयोजित केला आहे.

तसेच सावनगिरा व परिसरातील ग्रामस्थांच्या वतीने पदयात्रा काढून पर्जन्यवृष्टीसाठी लातूर जिल्ह्यातील जागृत देवस्थान मौजे माकणी थोर येथील हनुमंत रायाला जल अभिषेक करण्यात येणार आहे तसेच निलंगा शहरातील निळकंठेश्वर मंदिरात अभिषेक व महापुरुषांना अभिवादन करण्यात येणार आहे व उपजिल्हा रुग्णालयात फळे वाटप तसेच, जिल्हा परिषद शाळेमध्ये शालेय साहित्य वाटप करून तसेच मौजे बोरसुरी दि.२१ जून २०२६ रोजी मोफत सर्व रोग निदान व आरोग्य शिबिरांचे आयोजन करण्यात आले आहे.

# मिशन क्लीन अँड ग्रीन लातूर अंतर्गत टागोर उद्यानात स्वच्छता ,आयएमएचा पुढाकार



**लातूर/प्रतिनिधी:** इंडियन मेडिकल असोसिएशन लातूरतर्फे राबविण्यात येत असलेल्या मिशन क्लीन अँड ग्रीन लातूर २०२६ उपक्रमांतर्गत विलासराव देशमुख मार्गावरील रवींद्रनाथ टागोर उद्यान (वर्धमान पार्क) येथे सामूहिक स्वच्छता अभियान उत्साहात पार पडले. लातूर महानगरपालिकेच्या सहकार्याने आयोजित या उपक्रमात डॉक्टरांसह स्थानिक नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग घेत परिसर स्वच्छतेसह पर्यावरण संवर्धनाचा संदेश दिला.

अभियानादरम्यान उद्यान परिसरातील कचरा संकलन, स्वच्छता आणि पर्यावरणाबाबत जनजागृती करण्यात आली. लातूर हे केवळ शहर नसून आपली ओळख आणि सामूहिक जबाबदारी आहे, या भावनेतून स्वच्छ, हरित आणि निरोगी लातूर घडविण्यासाठी नागरिकांनी सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन यावेळी करण्यात आले.स्वच्छता ही केवळ प्रशासनाची जबाबदारी नसून प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य असल्याचा संदेशही या अभियानातून देण्यात आला.

या उपक्रमासाठी महानगरपालिकेच्या उपायुक्त वसुधा फड, आयएमएचे अध्यक्ष डॉ. हर्षवर्धन राऊत, सचिव डॉ. विश्रांत भारती, डॉ. आनंद कलमे, डॉ. आकांक्षा त्रिपाठी अवस्थी, डॉ. वेदांत अवस्थी, डॉ. सुबोध सोमाणी, डॉ. राजेश दराडे, डॉ. वर्षा दराडे, डॉ. शुभांगी राऊत, डॉ. शिवपूजे, डॉ. स्नेहल शिवपूजे तसेच ॲड. मीना गायकवाड, सतिष कातपुरे, मुंढे,अजय जाधव, स्वाती जाधव, उषा नारागुडे, ऋषिकेश कानडे, गायकवाड,उल्हास नारागुडे,यांच्यासह अनेकांनी परिश्रम घेतले.

## लातूर जिल्ह्यात शिक्षक पात्रता परीक्षेच्या ४१ परीक्षा केंद्रांवर प्रतिबंधात्मक आदेश लागू

**लातूर/ प्रतिनिधी:** महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेमार्फत आयोजित करण्यात आलेली महाराष्ट्र राज्य शिक्षक पात्रता परीक्षा २०२६ (टीईटी) रविवार, २८ जून २०२६ रोजी लातूर जिल्ह्यातील एकूण ४१ परीक्षा केंद्रांवर पार पडणार आहे. ही परीक्षा सकाळी १०.३० ते दुपारी १ आणि दुपारी २.३० ते सायंकाळी ५ अशा दोन सत्रांमध्ये घेतली जाणार आहे. जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड यांनी या परीक्षा केंद्रांच्या परिसरात भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ अन्वये प्रतिबंधात्मक आदेश लागू करण्यात आले आहेत.

या आदेशानुसार परीक्षा केंद्राच्या परिसरात प्रवेश करतेवेळी पाच किंवा त्यापेक्षा जास्त व्यक्तींना एकत्रितरित्या प्रवेश करता येणार नाही, तसेच कोणत्याही प्रकारच्या घोषणा देण्यास सक्त मनाई असेल. परीक्षार्थी किंवा अन्य कोणत्याही व्यक्तीकडून शांततेस बाधा निर्माण होईल असे कृत्य करता येणार नाही. त्याचप्रमाणे परीक्षा केंद्राच्या शंभर मीटरच्या परिसरातील झेरॉक्स सेंटर्स, पानटपरी, टायपिंग सेंटर, एसटीडी बूथ आणि ध्वनिक्षेपक यांसारखी सर्व माध्यमे व व्यावसायिक आस्थापने आदेशाची मुदत संपेपर्यंत पूर्णपणे बंद राहतील. याशिवाय, परीक्षा केंद्राच्या परिसरात मोबाईल फोन, सेल्युलर फोन, ई-मेल व इतर कोणतीही इलेक्ट्रॉनिक प्रसारमाध्यमे घेऊन प्रवेश करण्यास सक्त मनाई करण्यात आली आहे.

परीक्षा शांततेच्या वातावरणामध्ये पार पाडण्यासाठी कोणतीही बाधा उत्पन्न करता येणार नाही. परीक्षा केंद्रावर कोणत्याही अनधिकृत व्यक्तीस किंवा वाहनास प्रवेश मनाई राहील. हे प्रतिबंधात्मक आदेश २८ जून २०२६ रोजी सकाळी ८ ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत लागू राहतील. मात्र, हे आदेश परीक्षा केंद्रावर काम करणारे अधिकारी, कर्मचारी, केंद्रावर निगराणी करणारे अधिकारी आणि पोलीस अधिकारी व कर्मचारी यांच्याबाबत त्यांचे परीक्षासंबंधी कर्तव्य पार पाडण्याच्या अनुषंगाने लागू राहणार नाहीत.

# चन्नबसवेश्वर फार्मसी महाविद्यालयाची यशस्वी परंपरा कायम

**लातूर/प्रतिनिधी:** महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ मुंबई यांच्या वतीने घेण्यात आलेल्या औषधनिर्माणशास्त्र पदविका ( डी . फार्मसी ) उन्हाळी परीक्षा २०२६ चा निकाल नुकताच जाहीर झाला असून लातूर स्थित चन्नबसवेश्वर फार्मसी कॉलेजचा निकाल ९५ टक्के लागला आहे. द्वितीय वर्ष डी फार्मसी मधील विद्यार्थी रंजीरे अभिषेक अमित ८६.०० % गुण प्राप्त करून महाविद्यालयात सर्वप्रथम क्रमांक पटकावला असून याच महाविद्यालायची कु. बचके अश्विनी दिगंबर हिने ८४.००% गुण प्राप्त करून महाविद्यालयात द्वितीय व कु. कसबे प्रीती शिवाजी हिने ८३.००% गुण प्राप्त करून महाविद्यालयात तृतीय येण्याचा मान पटकावला आहे. यानिमित्ताने चन्नबसवेश्वर फार्मसी कॉलेजचे शैक्षणिक क्षेत्रातील वर्चस्व पुन्हा एकदा सिद्ध झाल आहे.






ह्या वर्षी डी फार्मसी द्वितीय वर्ष परीक्षेमध्ये ७५ टक्के पेक्षा जास्त गुण म्हणजेच विशेष प्राविण्यासाह उतीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांची संख्या बारा असून प्रथम श्रेणी मध्ये ३८ विद्यार्थ्यांने यश संपादन केले आहे . प्रथम वर्ष डी फार्मसी परीक्षेमध्ये व्यवहारे सुकन्या सुभाषराव व हिने ८४.०० टक्के गुण प्राप्त करुन महाविद्यालयात प्रथम तर कु. अलापुरे अश्विनी भारत हिने ८०.०० टक्के गुण मिळवून महाविद्यालयात द्वितीय स्थान मिळवले आहे. प्रथम वर्ष डी फार्मसी च्या परीक्षेमध्ये ७५ टक्के पेक्षा जास्त गुण प्राप्त केलेल्या विद्यार्थ्यांची संख्या ०९ असून प्रथम श्रेणी मध्ये १४ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. प्रथम वर्षाच्या एकूण निकाल ७०.०० टक्के लागला आहे . १९८० पासून औषध निर्माणशास्त्र अभ्यासक्रम राबवणारे चन्नबसवेश्वर फार्मसी कॉलेज हे महाराष्ट्रातील नामवंत महाविद्यालय असून शैक्षणिक गुणवत्ता अबाधित राखत असतानाच विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी सामाजिक ,क्रीडाविषयक, आरोग्यविषयक ,पर्यावरण पूरक कार्यक्रमाचे सातत्याने आयोजन केले जाते .यामुळेच विद्यार्थ्यांना केंद्रबिंदू मानून विद्यार्थ्यासोबत समाजाच्या सर्व घटकांचा परिपूर्ण विकास करण्याचा ध्यास व त्यादृष्टीने सततचे प्रयत्न या शैक्षणिक संकुलाच्या माध्यमातून केले जातात त्याचाच परिणाम म्हणून दरवर्षी या महाविद्यालायचे विद्यार्थी सपूर्ण राज्यात चमकतात.

फार्मसी कॉनसील ऑफ इंडिया च्या वतीने डी फार्मसीसाठी देशभर नवीन अभ्यासक्रम लागू केला आहे. या नवीन अभ्यासक्रमानुसार फार्मसिस्ट हा फक्त औषध विक्रेता न राहता औषध तज्ञ म्हणून समाजात कार्य करावे असे अपेक्षित असताना व नवीन अभ्यासक्रम राबविताना येत असलेल्या अनेक अडचणीवर मात करणे चन्नबसवेश्वर महाविद्यालयाने परत एक वेळेस या निकालाच्या माध्यमातून आपली गुणवत्ता सिद्ध केली आहे. कॉलेजच्या या आगळ्यावेगळ्या सुत्रामुळे चन्नबसवेश्वर फार्मसी कॉलेजने आदर्शवत लातूर फार्मसी पॅटर्न तयार केला आहे याची नोंद व अनुकरण राज्याच्या कानाकोपऱ्यांत केले जाते.

महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई यांच्या वतीने दरवर्षी महाराष्ट्रातील प्रत्येक डी .फार्मसी कॉलेजचे शैक्षणिक आवेक्षण केले जाते, या दरम्यान महाविद्यालयांमध्ये उपलब्ध सोयी सुविधा, महाविद्यालयाची शैक्षणिक वाटचाल, निकालाची सरासरी याची सखोल तपासणी केली जाते . सदरच्या आवेक्षणमध्ये चन्नबसवेश्वर फार्मसी कॉलेजला सातत्याने अतिउत्कृष्ट शेरा देऊन गौरविले जाते आणि हा सन्मान मागील तीस वर्षापासून महाविद्यालयास प्राप्त होत आहे. यावर्षीच्या डी. फार्मसी चा निकाल च्या माध्यमातून चन्नबसवेश्वर च्या शिरपेचामध्ये मानाचा तुरा परत एकदा रोवला गेला.

ह्यावर्षीच्या दर्जेदार निकालामुळे लातूरच्या फार्मसीच्या शैक्षणिक क्षेत्रामध्ये आनंद व्यक्त होत आहे. सर्व गुणवंत विद्यार्थिनी, विद्यार्थी यांचे पंचाक्षरी शिवाचार्य ट्रस्टचे सचिव भीमाशंकर देवणीकर, संचालक विजयकुमार मठपती ,अरुण हरगुडे, डॉ. अशोक सांगवीकर, अनुप देवणीकर, प्राचार्य डॉ. संजय थोंटे तसेच प्राध्यापाक व कर्मचारी मंडळाच्या वतीने कौतुक केले. सर्व प्रज्ञावंत विद्यार्थ्याचे कौतुक प्रा. प्रताप भोसले , प्रा. रवि राजूरकर, प्रा. बसवराज सुगावे, प्रा. रामलिंग सुगावे, प्रा. दत्ताहरी कवडेवार ,प्रा.गंगासागर कर्डिले, कार्यालयीन अधिक्षक शिवहर विभूते, प्रदीप रामेगावकर , अमोल सोनकांबळे ,ईश्वर डोंगरे, गणेश एस स्वामी, सिद्धेश्वर स्वामी, अक्षय खंडापुरे , स्वाती ऐतनबोने, शारदा स्वामी , धनराज स्वामी, युवराज खुणे ,सिद्धेश्वर वैरागकर , आदींनी केले.

# जय भारत कॉलेज ऑफ फार्मसी, दापका उज्वल निकालाची परंपरा कायम!

**निलंगा /आयुब बागवान :** महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ द्वारे आयोजित उन्हाळी बोर्ड परीक्षा २०२६ चा निकाल नुकताच जाहीर झाला असून, यामध्ये दापका (ता. निलंगा) येथील जय भारत कॉलेज ऑफ फार्मसीच्या विद्यार्थ्यांनी आपल्या उत्कृष्ट अभ्यासाच्या जोरावर घवघवीत यश संपादन केले आहे. महाविद्यालयाने यंदाही आपली उत्कृष्ट निकालाची आणि गुणवत्तेची परंपरा कायम राखली आहे.

*महाविद्यालयाचा डी. फार्मसी द्वितीय वर्षाचा एकूण निकाल ८८.४०% लागला असून.

यामध्ये मोमीन जुल्हा अस्मा नूरपाशा हिने ७८.६४% गुण मिळवून महाविद्यालयात प्रथम येण्याचा मान मिळवला. तसेच सरवदे रसिका गोविंद (७४.६४%) हिने द्वितीय, तर घाटे मुस्कान सलिम (७४.१८%) हिने तृतीय क्रमांक पटकावला. यासोबतच पांचांगे किरण प्रकाश व पवार दिपाली कामराज यांनी ७३.५५% गुणांसह संयुक्तपणे चतुर्थ, मंथाळे क्रांती संतराम (७२.८२%) पाचवा आणि म्हेत्रे साक्षी बालाजी ने ६९.९१% गुणांसह सहावा क्रमांक मिळवला.

डी. फार्मसी प्रथम वर्षाचा एकूण निकाल ८९.२९% लागला असून,* यात येणगे सुष्मा व्यंकट हिने ७१.३०% गुणांसह प्रथम क्रमांक मिळवला. माने राणी संजय (७०.३०%) हिने द्वितीय, पाटील प्रतिक्षा रमेश (६७.९०%) हिने तृतीय, रूपनर करण गोविंद (६६.८०%) याने चतुर्थ आणि देशमुख अहमद घुदुसाब याने ६६.३०% गुण मिळवून पाचवा क्रमांक पटकावला.

यशाचे उत्तुंग शिखर गाठणाऱ्या या सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. श्रीकृष्ण शिंदे सर, संस्थेचे कार्याध्यक्ष श्री. वसंतराव पाटील साहेब, अध्यक्ष श्री. राजेश्वर पाटील, विश्वस्त श्री. भोईबार सर, श्री. रेड्डी सर तसेच महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक वृंद व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी मनापासून कौतुक केले आहे. विद्यार्थ्यांच्या या यशामुळे दापका व निलंगा परिसरातून त्यांचे विशेष अभिनंदन होत असून, त्यांच्या पुढील उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या जात आहेत.

## प्रा.ज्योत्स्ना गायकवाड यांना राज्यशास्त्र विषयात पी एच.डी पदवी

**लातूर/ प्रतिनिधी:** इंदापूर तालुका ग्रामविकास प्रतिष्ठानचे विश्वासराव रणसिंग महाविद्यालय कळंब-वालचंदनगर ता.इंदापूर जि.पुणे येथील राज्यशास्त्र विभाग प्रमुख प्रा.डॉ ज्योत्स्ना गंगाराम गायकवाड-वाघमारे यांना स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड यांच्यावतीने राज्यशास्त्र विषयात पीएच.डी. पदवी प्राप्त केली. गायकवाड यांनी पी एचडी प्राप्त केल्याबद्दल इंदापूर तालुका ग्रामविकास प्रतिष्ठानचे सचिव विरसिंह रणसिंग यांच्या हस्ते त्यांचा सन्मान करण्यात आला.यावेळी महाविद्यालय प्राचार्य डॉ अशोक काळंगे,उपप्राचार्य ज्ञानेश्वर गुळीग ,डॉ प्रशांत शिंदे इ मान्यवर महाविद्यालयीन प्राध्यापक व प्राध्यापकेत्तर कर्मचारी उपस्थित होते. डॉ गायकवाड यांच्या प्रबंधाचा विषय उच्चशिक्षित महिलांचा राजकीय सहभाग: एक चिकित्सक अभ्यास (विशेष संदर्भ लातूर जिल्हा)हा होता. त्याचे मार्गदर्शक प्रा.डॉ. व्ही.एल एरंडे माजी प्राचार्य महाराष्ट्र महाविद्यालय निलंगा,व सहमार्गदर्शक प्रा.डॉ.महादेव गव्हाणे प्राचार्य राज्यर्षी शाहू महाविद्यालय लातूर होते.

डॉ गायकवाड यांनी पी एचडी पदवी प्राप्त केल्याबद्दल इंदापूर तालुका ग्रामविकास प्रतिष्ठानच्या अध्यक्षा आनंदी रणसिंग,उपाध्यक्ष प्रकाश कदम ,खजिनदार विरबाला पाटील,विश्वस्त कुलदीप हेगडे,विश्वस्त शंकरराव रणसिंग,विश्वस्त राही रणसिंग यांनी अभिनंदन केले.

# एसटी महामंडळातर्फे विद्यार्थ्यांना मिळणार 'एनसीएमसी' स्मार्ट कार्ड; आधार संलग्न 'सरल' व 'अपार' क्रमांक अनिवार्य

**लातूर/प्रतिनिधी:** राज्य परिवहन महामंडळातर्फे विविध सामाजिक घटकांना प्रवास भाड्यात देण्यात येणाऱ्या सवलतींसाठी आता आधारकार्ड संलग्न 'एनसीएमसी अनेब्ल्ड स्मार्ट कार्ड' वितरीत करण्यात येत आहे. लवकरच शालेय व व्यावसायिक शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या सवलतीच्या पासेसकरिताही या कार्डची नोंदणी प्रक्रिया सुरू करण्यात येणार आहे. शासनाच्या ९ ऑक्टोबर २०१८ च्या निर्णयानुसार सवलतधारी प्रवाशांना स्मार्ट कार्ड देण्याचे निश्चित करण्यात आले होते. त्यानुसार राज्य परिवहन महामंडळ, मे. ईबिक्स टेक्नोलॉजिस लि. आणि एनएसडीएल पेमेंट्स बँक यांच्या संयुक्त विद्यमाने हे कार्ड देण्याची कार्यवाही सर्व आगारांमध्ये सुरू आहे. १६ फेब्रुवारी २०२६ पासून अमृत ज्येष्ठ नागरिक, ज्येष्ठ नागरिक आणि महिला सवलतधारी प्रवाशांसाठी कार्ड नोंदणी व वितरण प्रक्रिया सुरू करण्यात आली असून, याच धर्तीवर आता नजीकच्या काळात विद्यार्थ्यांनाही हे स्मार्ट कार्ड दिले जाणार आहे.

शालेय, शैक्षणिक, तांत्रिक आणि व्यावसायिक शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना आता 'सरल' व 'अपार' क्रमांक संलग्न एनसीएमसी कार्ड प्राप्त होणार आहे. यासाठी हे दोन्ही क्रमांक विद्यार्थ्यांच्या आधार क्रमांकाशी जोडलेले असणे अनिवार्य आहे. शालेय विद्यार्थ्यांना मासिक पासाकरिता लागणाऱ्या या स्मार्ट कार्डचा मागणी अर्ज एसटी महामंडळाच्या अधिकृत संकेतस्थळावर मोफत उपलब्ध करून देण्यात आला आहे. या अर्जात नमूद केलेली माहिती व जोडलेली आवश्यक कागदपत्रे संबंधित शाळेच्या मुख्याध्यापकांकडून प्रमाणित करून घेणे आवश्यक असून, त्यानंतरच हा अर्ज आगारातील किंवा बसस्थानकावरील वाहतूक नियंत्रक अथवा अधिकृत एजंट यांच्याकडे जमा करावयाचा आहे. या कार्डच्या नोंदणी प्रक्रियेसाठी विद्यार्थी किंवा त्यांच्या पालकांचा चालू मोबाईल (भ्रमणध्वनी) क्रमांक देणे बंधनकारक करण्यात आले आहे.

अर्जाची तपासणी व पडताळणी झाल्यानंतर आवश्यक शुल्क आकारून विद्यार्थ्यांना पावती दिली जाईल. नोंदणी पूर्ण झालेले हे एनसीएमसी कार्ड ३० दिवसांच्या आत प्रिंट करून संबंधित आगारास प्राप्त होईल आणि त्यानंतर आगारामध्ये पॉस (पीओएस) मशिनद्वारे हे कार्ड क्टिव्ह करून ते प्रत्यक्ष विद्यार्थ्यांना वितरित केले जाईल. तरी सर्व संबंधित विद्यार्थी आणि पालकांनी नोंदणी प्रक्रियेसाठी आवश्यक कागदपत्रांची आगाऊ पूर्तता करून ठेवावी, असे आवाहन लातूर राज्य परिवहन महामंडळाच्या लातूर विभाग नियंत्रकांनी केले आहे.


प्रो. जडे यांचे रबरी शिक्के
कॉम्प्युटर नॉयलॉन रबर असलेले
टिकाऊ रबरी शिक्के
तयार करून मिळतील.




शाखा १.
जडे-भारत प्रिंटींग प्रेस, मेनरोड, लातूर
शाखा २.
जडेऑफसेट प्रिंटर्स, मित्र नगर, लातूर
संपर्क: (०२३८२) २४२६०८,२४५४०९

# डॉ. हनुमंत कराड यांचा ७० वा वाढदिवस सामाजिक उपक्रमांनी साजरा

## ७४ जणांचे रक्तदान; वृध्दाश्रमात अन्नदान आणि ग्रंथतुलेव्दारे वाचनसंस्कृतीचा संदेश



**लातूर/प्रतिनिधी:** माईर एमआयटी शिक्षण संस्था समूहाचे कार्यकारी संचालक डॉ. हनुमंत कराड यांचा ७० वा वाढदिवस विविध सामाजिक उपक्रमांच्या माध्यमातून उत्साहात साजरा करण्यात आला. डॉ. कराड यांच्या वाढदिवसानिमित्त रक्तदान शिबिर, वृध्दाश्रमात अन्नदान व ग्रंथतुला असे सामाजिक उपक्रम घेण्यात आले.

डॉ. हनुमंत कराड यांच्या वाढदिवसानिमित्त एमआयडीएसआर दंत महाविद्यालय, एमआयपी फिजिओथेरपी महाविद्यालय व श्रीमती सरस्वती कराड रक्तपेढी यांच्या संयुक्त विद्यमाने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिराचे उद्घाटन डॉ. हनुमंत कराड यांच्या हस्ते झाले. शिबिरात ७४ रक्तदात्यांनी रक्तदान करून वाढदिवस साजरा केला.

यावेळी एमआयएमएसआर वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. एन. पी. जमादार, उप अधिष्ठाता डॉ. बी. एस. नागोबा, रक्तसंक्रमण अधिकारी डॉ. मिना सोनवणे, मुख्य प्रशासकीय अधिकारी सुनिल कवटेकर, प्रशासकीय अधिकारी शंकर ससाने, बाबासाहेब सूर्यवंशी, सत्यवान झरे, दक्षता अधिकारी सतिश बाबळसुरे, संयोजक ज्ञानोबा केंद्रे, स्वीय सहाय्यक दयानंद कुलकर्णी उपस्थित होते.

वाढदिवसानिमित्त डॉ. हनुमंत कराड यांची ग्रंथतुलाही करण्यात आली. ग्रंथतुलेतील पुस्तके विविध सार्वजनिक ग्रंथालयांना दान करण्यात येणार असून, या उपक्रमातून ज्ञानप्रसार आणि वाचनसंस्कृती संवर्धनाचा संदेश देण्यात आला.

ग्रंथतुला कार्यक्रमास एमआयटी शिक्षण संस्था समूहाचे संचालक प्रा. तेजस कराड, ग्रंथपाल प्रदीप मदने, ज्ञानोबा केंद्रे, शंकर ससाने, दयानंद कुलकर्णी, सतिश बाबळसुरे, बळीराम हांडगे यांच्यासह शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

याशिवाय डॉ. कराड यांच्या वाढदिवसानिमित्त मातोश्री वृध्दाश्रमात ज्येष्ठ नागरिकांना स्नेहभोजन देऊन अन्नदान करण्यात आले. यावेळी प्रा. तेजस कराड, सुनिल कवटेकर, बाबासाहेब सुर्यवंशी, दयानंद कुलकर्णी, सुर्यकांत इरपे आदी उपस्थित होते.

एमआयटी शिक्षण संकुलातील विविध महाविद्यालयांचे प्राचार्य, विभागप्रमुख, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी, पालक, रुग्ण तसेच विविध क्षेत्रांतील मान्यवर आणि हितचिंतकांनी प्रत्यक्ष भेटून डॉ. हनुमंत कराड यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या.

# मनपातील ११ विभागांना महापौरांच्या अचानक भेटी: अनेक कर्मचारी आढळले गैरहजर; संबंधितावर होणार कारवाई

**लातूर/ प्रतिनिधी:** महापौर सौ.जयश्रीताई सोनकांबळे यांनी शुक्रवारी (दि. १९) महानगरपालिकेतील एकूण ११ विभागांना अचानक भेटी दिल्या. यावेळी अनेक विभाग प्रमुख व कर्मचारी गैरहजर असल्याचे आढळून आले.या कर्मचाऱ्यांवर कारवाई केली जाणार असल्याचे महापौरांनी सांगितले.

विविध कामांसाठी नागरिक महानगरपालिकेत येत असतात. यावेळी अधिकारी व कर्मचारी गैरहजर असल्याच्या तक्रारी येत होत्या.कर्मचारी उपस्थित नसल्याने नागरिकांना चकरा माराव्या लागत होत्या.या तक्रारींची दखल घेऊन महापौरांनी नगरसेवकांसह शुक्रवारी विविध विभागांना भेटी देऊन प्रत्यक्ष पाहणी केली.

यावेळी अनेक विभाग प्रमुख व कर्मचारी आपापल्या कामाच्या ठिकाणी गैरहजर असल्याचे आढळून आले. काही कर्मचाऱ्यांनी रजा दिल्याचे सांगण्यात आले परंतु रजा मंजूर नसतानाही ते कर्मचारी गैरहजर आढळले.महापौरांनी भेटी दिलेल्या ११ विभागातील हजेरीपट तपासणीसाठी ताब्यात घेतले आहेत. भेटीच्या वेळी जे कर्मचारी गैरहजर आढळले त्या संदर्भात आयुक्ताशी चर्चा करून कारवाई केली जाणार असल्याचे महापौरांनी यावेळी सांगितले.

अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या गैरहजेरीचा प्रकार गंभीर आहे. याप्रकरणी संबंधितांना बोलावून शहानिशा केली जाईल. लातूरकरांची गैरसोय होणार नाही, याची काळजी घेतली जाईल, असेही महापौर म्हणाल्या.

# शिवाजीनगर पोलिसांची कारवाई: १४ लाख ५४ हजार रुपयांचा प्रतिबंधित गुटखा जप्त




**लातूर/प्रतिनिधी :** लातूर जिल्ह्यात प्रतिबंधित गुटखा व सुगंधित तंबाखूच्या अवैध व्यापाराविरोधात पोलीस प्रशासनाने मोहिम सुरू केली असून त्या अंतर्गत शिवाजीनगर पोलीस ठाण्याच्या पथकाने पहाटेच्या सुमारास केलेल्या कारवाईत १४ लाख ५४ हजार २०० रुपये किमतीचा प्रतिबंधित गुटखा व वाहतुकीसाठी वापरण्यात आलेली चारचाकी जप्त केली आहे. या कारवाईत एका आरोपीस ताब्यात घेण्यात आले असून त्याच्याविरुद्ध विविध कायद्यांन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्ह्यात अवैध धंद्यांविरोधात विशेष मोहीम राबविण्यात येत आहे. त्याच अनुषंगाने शिवाजीनगर पोलीस ठाण्यास गुटख्याची मोठी खेप शहरात येणार असल्याची माहिती प्राप्त झाली होती. प्राप्त माहितीची शहानिशा करून पोलीस निरीक्षक संतोष पाटील यांच्या आदेशानुसार पथकाने दि. १९ जून २०२६ रोजी पहाटे सुमारे २.३० वाजण्याच्या सुमारास सरकारी दवाखाना ते छत्रपती शिवाजी महाराज चौकाकडे जाणाऱ्या जुन्या रेल्वे लाईन परिसरात सापळा रचला.

यावेळी संशयास्पदरीत्या येणारी काळ्या रंगाची ह्युंदाई क्रेटा ही कार अडवून तपासणी करण्यात आली. तपासणीदरम्यान वाहनामध्ये महाराष्ट्र शासनाने प्रतिबंधित केलेला विविध कंपन्यांचा गुटखा व सुगंधित तंबाखूचा मोठा साठा आढळून आला. पोलिसांनी तत्काळ वाहनासह संपूर्ण मुद्देमाल जप्त करून चालकास ताब्यात घेतले.

या कारवाईत इरफान चांदपाशा शेख (वय २१ वर्षे, रा. निवाडा, ता. रेणापूर, जि. लातूर) यास ताब्यात घेण्यात आले आहे. जप्त करण्यात आलेल्या मुद्देमालामध्ये एकूण ४ लाख ५४ हजार २०० रुपये किमतीचा प्रतिबंधित गुटखा व सुगंधित तंबाखू तसेच १० लाख रुपये किमतीची ह्युंदाई क्रेटा कार असा मिळून १४ लाख ५४ हजार २०० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

सदर प्रकरणी संबंधिताविरुद्ध भारतीय न्याय संहिता (इछड) कलम १२३, २७४, २७५, २२३ तसेच अन्न सुरक्षा व मानके अधिनियम २००६ मधील विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

ही कारवाई पोलीस अधीक्षक अमोल तांबे, अपर पोलीस अधीक्षक श्री. मंगेश चव्हाण, उपविभागीय पोलीस अधिकारी (लातूर शहर) समीरसिंह साळवे यांचे मार्गदर्शनात शिवाजीनगर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक संतोष पाटील यांच्या नेतृत्वात सहाय्यक पोलीस निरीक्षक भालचंद्र तिडके, सहाय्यक फौजदार संजय फुलारी, पोलीस अमलदार राहुल सोनकांबळे, बालाजी कोतवाड, प्रशांत ओगले, ओम बेस्के, किशोर माने, परमेश्वर अंकुलगे, नारायण शिंदे व महेश चव्हाण यांनी केली आहे.

# शेतातील रस्त्याच्या वादातून खून करणाऱ्या आरोपीस जन्मठेप.

## निलंगा न्यायालयाचा महत्त्वपूर्ण निकाल; पुरावा नष्ट करण्याचाही गुन्हा सिद्ध

**शेतातील ये-जा करण्याच्या रस्त्याच्या किरकोळ वादातून एका व्यक्तीचा निर्घृण खून करून त्याचा पुरावा नष्ट करण्याचा प्रयत्न करणाऱ्या गुन्हेगारास मा. अतिरिक्त सत्र न्यायालय, निलंगा यांनी जन्मठेपेची शिक्षा सुनावून गंभीर गुन्ह्यांविरोधात कठोर संदेश दिला आहे.**

**लातू/प्रतिनिधी:** पोलीस ठाणे निलंगा येथे दाखल असलेल्या गुन्हा क्रमांक २४९/२०२३ मधील घटनेची पोलिसाकडून मिळालेली माहिती अशी की, संभाजी गोविंद घोटाळे, रा. तळीखेड, ता. निलंगा यास अतिरिक्त सत्र न्यायाधीश श्री. एस. बी. पवार यांनी दिनांक १७ जून २०२६ रोजी भारतीय दंड संहिता कलम ३०२ अन्वये जन्मठेप व २० हजार रुपये दंड, तसेच कलम २०१ अन्वये पाच वर्षे सश्रम कारावास व ५ हजार रुपये दंड अशी शिक्षा सुनावली. न्यायालयाने दंडाची संपूर्ण रक्कम मयताच्या वारसांना देण्याचेही आदेश दिले आहेत.

या प्रकरणात फिर्यादी लक्ष्मण चंदर घोटाळे यांनी दिनांक १४ ऑगस्ट २०२३ रोजी पोलीस ठाणे निलंगा येथे तक्रार दाखल केली होती. त्यानुसार तळीखेड शेतशिवारात संभाजी घोटाळे याने मयत भरत चंदर घोटाळे यांच्याशी शेतातील येण्या-जाण्याच्या वाटेच्या कारणावरून वाद घालून त्यांच्यावर काठीने मारहाण केली व गळा दाबून त्यांचा खून केला. त्यानंतर गुन्ह्याचा पुरावा नष्ट करण्याच्या उद्देशाने मृतदेह शेतातील आखाड्यावर जनावरांच्या गोठ्याजवळ नेऊन ठेवला.

घटनेची माहिती मिळताच तत्कालीन पोलीस उपनिरीक्षक श्री. एस. के. सुरवसे यांनी तपासाची सूत्रे हाती घेतली. तपासादरम्यान प्रत्यक्षदर्शी साक्षीदारांचे जबाब, घटनास्थळावरील पुरावे, वैद्यकीय अहवाल तसेच गुन्हेगाराने मृतदेहाची विल्हेवाट लावून पुरावा नष्ट करण्याचा केलेला प्रयत्न याबाबत ठोस पुरावे संकलित करण्यात आले. त्याआधारे मूळ गुन्ह्यात भारतीय दंड संहिता कलम २०१ ची वाढ करून दोषारोपपत्र मा. अतिरिक्त सत्र न्यायालय, निलंगा येथे दाखल करण्यात आले.

न्यायालयीन सुनावणीदरम्यान आरोपीने गुन्हा नाकारला असला तरी सरकार पक्षाने सादर केलेले ठोस व सुसंगत पुरावे निर्णायक ठरले. या खटल्यात एकूण सात साक्षीदार तपासण्यात आले. विशेषतः प्रत्यक्षदर्शी साक्षीदार आणि वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या साक्षीमुळे आरोपीविरुद्धचे आरोप भक्कमपणे सिद्ध झाले.

सरकार पक्षातर्फे अतिरिक्त सरकारी अभियोक्ता श्री. कपिल व्ही. पंढरीकर यांनी प्रभावी युक्तिवाद करून आरोपीचा गुन्हा न्यायालयासमोर सिद्ध केला. त्यांच्या युक्तिवादासह तपास यंत्रणेने सादर केलेल्या पुराव्यांची साखळी ग्राह्य धरून मा. न्यायालयाने आरोपीस दोषी ठरविले.

सदर प्रकरणाच्या यशस्वी निकालासाठी तत्कालीन तपासी अधिकारी पोलीस उपनिरीक्षक श्री. एस. के. सुरवसे, प्रभारी अधिकारी पोलीस निरीक्षक श्री. अभिषेक शिंदे, कोर्ट समन्वय अधिकारी सहाय्यक पोलीस निरीक्षक श्री. सदानंद वाघमारे, कोर्ट पैरवी अधिकारी पोलीस हवालदार एस. के. बुलबुले तसेच कार्यालयीन कर्मचारी एच. जी. बिरादार यांनी विशेष परिश्रम घेतले.

या निकालामुळे गंभीर स्वरूपाच्या गुन्ह्यांमध्ये शास्त्रोक्त तपास, सक्षम पुरावे आणि प्रभावी न्यायालयीन मांडणी यांचे महत्त्व पुन्हा अधोरेखित झाले असून, कायद्यापासून कोणीही सुटू शकत नाही हा ठाम संदेश समाजात गेला आहे.

# दयानंद विज्ञान महाविद्यालयाने MHT-CET परीक्षेच्या फेज -२ मध्येही घवघवीत यश

**लातूर/प्रतिनिधी:** MHT-CET (PCM) चि. मामनगर कपील शिवाजी या विद्यार्थ्याने ९९.७९३६७२६ पर्सेंटाईल गुण मिळवून महाविद्यालयात प्रथम क्रमांक पटकावला. कु. पवार अंकिता अनंत या विद्यार्थिनीने ९९.७००७२८५ पर्सेंटाईल गुणांसह द्वितीय क्रमांक मिळविला तसेच चि. धोत्रे दीपक प्रभाकर या विद्यार्थ्याने ९९.५३७१३५२ पर्सेंटाईल मिळवत तृतीय क्रमांक मिळवून उल्लेखनीय यश संपादन केले.

चक्ढ-उएढ परीक्षेत झउइ ग्रुपमध्ये चि. जोशी अवधूत या विद्यार्थ्याने ९९.६३२००३३ पर्सेंटाईल गुण घेऊन महाविद्यालयात प्रथम क्रमांक मिळविला आहे. त्याचप्रमाणे कु. डुकरे श्रेया या विद्यार्थीनीने ९९.३०१४४६४ पर्सेंटाईल गुण घेऊन महाविद्यालयातून द्वितीय क्रमांक मिळविला आहे तर कु. बिजले समिक्षा या विद्यार्थीनीने ९९.०५५१६१९ पर्सेंटाईल गुण घेऊन महाविद्यालयातून तृतीय क्रमांक मिळविला आहे. ९९ पर्सेंटाईल पेक्षा जास्त गुण घेणारे एकूण ९ विद्यार्थी आहेत. ९८ पर्सेंटाईल पेक्षा जास्त गुण घेणारे एकूण १५ विद्यार्थी आहेत तर ९५ पर्सेंटाईल पेक्षा जास्त गुण घेणारे एकूण ३९ विद्यार्थी आहेत आणि ९० पर्सेंटाईल पेक्षा जास्त गुण घेणारे एकूण ८१ विद्यार्थी आहेत.

या यशाबद्दल सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष मा. लक्ष्मीरमणजी लाहोटी, उपाध्यक्ष ललीतभाईजी शहा, उपाध्यक्ष रमेशकुमारजी राठी, सचिव रमेशजी बियाणी, संयुक्त सचिव विशालजी लाहोटी, सहाय्यक सचिव ॲड. श्रीकांतजी उटगे, सहाय्यक सचिव अजिंक्यजी सोनवणे, कोषाध्यक्ष संजयजी बोरा, शालेय समिती सदस्य मा. रवींद्रजी राठी, मा. प्रणवजी शहा, सी.ई.टी. सेलचे चेअरमन डॉ. चेतनजी सारडा, शैक्षणिक विकास अधिकारी डॉ. जयप्रकाश दरगड, दयानंद विज्ञान महाविद्यालायाचे प्राचार्य डॉ. सिद्धेश्वर बेल्लाळे, उपप्राचार्य भाऊसाहेब सरवदे, पर्यवेक्षक डॉ. हेमंत वरुडकर आणि पर्यवेक्षिका डॉ. संध्या कोल्हे तसेच, प्रा. अनिलकुमार माळी, नीट समन्वयक डॉ कोमल गोमारे, सी ई टी समन्वयक प्रा. कविता जाधव प्रा. वेंकटेश कैले जेईई समन्वयक रवी कुमार आदीसह सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी कौतुक केले आहे.

## छाप..

लागेबांधे ना साधे सुधे
आशिर्वाद मिळो छुपा
सामीलहोतात सरदार
हप्ता पोचवायचा नृपा
खालच्यांची मिळेसाथ
असता वरच्यांची कृपा
कपड्या गुंडाळे लफडे
सांभाळायचे शिरटोपा
खुशाल चालू दे भेसळ
टाकणारं नाही रे छापा
विकतघेई रखवालदार
आरामात सगळे झोपा
उघडउघड काळा धंदा
ना भीक कुणाचे बापा
धाडींची हो पूर्व सूचना
ऐका घोड्याच्या टापा
हातकाळे सगळ्यांचेचं
सामील करून घे पापा
तुकडेटाकू भुंकणा-यां
मग मजेत मलई चोपा
सरळचालले असताना
करतातकुणी इचकोपा
सांभाळून राहती वरिष्ठ
जरासाही बसला टप्पा
उघडू नका जरा सुद्धा
मनांमधला पुण्यकप्पा
पिडले जाती जे कुणी
जराशी वाटो अनुकंपा

**हेमंत मुसरीफ पुणे**
९७३०३०६९९६

## दुचाकीला धडक; एक गंभीर जखमी

**किल्लारी/प्रतिनिधी:** औसा तालुक्यातील नदीतरंगा सांगवी रोडवर १६ जून रोजी सायंकाळी पावणेसहाच्या सुमारास एक अपघात झाला. एका भरधाव वाहनचालकाने (क्रमांक एमए-४२-एआर-५७८२) आपले वाहन हलगर्जीपणे चालवून रस्ता ओलांडताना, डाव्या बाजूने जाणाऱ्या दुचाकीला (क्रमांक एमएच-२४-सीजी-१९३८) जोरदार धडक दिली.

या धडकेत दुचाकीवरील व्यक्ती गंभीर जखमी झाली आहे. दुचाकीचे सुमारे ३० ते ४० हजार रुपयांचे नुकसान झाले आहे. याप्रकरणी फिर्यादी बालाजी विभुते यांच्या तक्रारीवरून किलारी पोलिसांनी वाहनचालकाविरुद्ध भारतीय न्याय संहितेच्या विविध कलमांन्वये गुन्हा दाखल केला आहे.

# दयानंद महाविद्यालयाच्यावतीने प्रा. किसनाथ कुडके यांचा सत्कार



**लातूर/प्रतिनिधी:** राष्ट्रीय सेवा योजना (+२ स्तर) लातूर जिल्हा समन्वयकपदी महात्मा बसवेश्वर महाविद्यालयाचे प्रा. किसनाथ कुडके यांची नियुक्ती झाल्याबद्दल दयानंद महाविद्यालय, लातूर यांच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड, पर्यवेक्षक प्रा. प्रशांत दीक्षित, राष्ट्रीय सेवा योजना विभागीय समन्वयक डॉ. संदीपान जगदाळे, कार्यक्रमाधिकारी प्रा. अनिल भुरे तसेच प्रा. सिद्धार्थ भालेराव उपस्थित होते.

प्रा. किसनाथ कुडके हे दयानंद महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी असून त्यांनी बारावीपासून एम.ए. (इंग्रजी) पर्यंतचे शिक्षण दयानंद महाविद्यालयात पूर्ण केले आहे. त्यांच्या शैक्षणिक, सामाजिक व राष्ट्रीय सेवा योजना क्षेत्रातील कार्याचा गौरव म्हणून हा सत्कार करण्यात आला.

याप्रसंगी उपस्थित मान्यवरांनी प्रा. कुडके यांचे अभिनंदन करून त्यांच्या पुढील कार्यासाठी शुभेच्छा व्यक्त केल्या. जिल्हा समन्वयक म्हणून त्यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रीय सेवा योजना अधिक प्रभावीपणे कार्य करेल, असा विश्वासही व्यक्त करण्यात आला.


**मध्य रेल्वे**
सोलापुर मंडळ
विविध इंजीनियरिंग कार्य

विभागीय रेल्वे व्यवस्थापक (कामे) मध्य रेल्वे सोलापूर आणि मा. भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने प्रतिष्ठित कंपन्या/कंत्राटदारांकडून खालील कामांसाठी ई-निविदा मागवीत आहेत: **निविदा सूचना क्र.: 15-2026-SrDENCo, कामाचे नाव:** १. बोरोटी (BOT) आणि कुलाली (KUI) स्थानकांवर उच्च-स्तरीय फलाटाची (HL PF) तरतूद. २. होतागी (HG) स्थानकावर उच्च-स्तरीय फलाटाची (HL PF) तरतूद. **कामाचा अंदाजित खर्च:** १५,४९,७७,८२१.७१, **अनामत रक्कम:** ३०,९९,६००/-, **काम पूर्ण करण्याचा कालावधी:** १२ महिने, **देखभाल कालावधी:** २४ महिने. **निविदा सूचना क्र.: 16-2026-SrDENC, कामाचे नाव:** १. जिंती रोड (JNTR), पारेवाडी (PRWD) (आताचे नाव KEU) आणि मोहोळ (MO) स्थानकांवर उच्च-स्तरीय फलाटाची (HL PF) तरतूद. २. माळठाण (MLM) आणि भिगवण (BGVN) स्थानकांवर उच्च-स्तरीय फलाटाची (HL PF) तरतूद. **कामाचा अंदाजित खर्च:** २३,२४,१४,८४९.१६, **अनामत रक्कम:** ४६,४८,३००/-, **काम पूर्ण करण्याचा कालावधी:** १२ महिने, **देखभाल कालावधी:** २४ महिने. **www.ireps.gov.in** या **संकेतस्थळावर निविदा अपलोड करण्याची अंतिम तारीख आणि वेळ: 15-2026-SrDENCO साठी १०.०७.२०२६ रोजी १५.०० वाजेपर्यंत; 16-2026-SrDENCO साठी ०८.०७.२०२६ रोजी १५.०० वाजेपर्यंत. www.ireps.gov.in वर निविदा उघडण्याची तारीख आणि वेळ: 15-2026-SrDENCO साठी १०.०७.२०२६ रोजी १५.३० वाजता; 16-2026-SrDENCO साठी ०८.०७.२०२६ रोजी १५.३० वाजता.** संभाव्य निविदाकारांना सल्ला दिला जातो की, या निविदेबाबत जारी केलेले कोणतेही बदल किंवा शुद्धिपत्रके पाहण्यासाठी निविदा बंद होण्याच्या तारखेपूर्वी त्यांनी वारंवार संकेतस्थळाला भेट द्यावी. संकेतस्थळ: www.ireps.gov.in **मं.रे.व्य. (का.)**

धोकादायक आणि स्फोटक वस्तू घेऊन प्रवास करणे हा दंडनीय गुन्हा आहे. 32



निलंगा शहरातील एलआयसी विमा भरण्याचे केंद्र
**सितारी विमा सेवा केंद्र**
दु.नं.२३, इदगाह कॉम्प्लेक्स, जनता दवाखान्यासमोर शिवाजी चौक, निलंगा.
वेळ सकाळी ९ ते सायं. ९ पर्यंत
जमीरोद्दीन सितारी
चेअरमन क्लक मेंबर CLIA
एजंट भरती चालू आहे.
संपर्क
Off: (02384) 242224, 9422612239, 9422658396


Printed and Published by Dayanand Shankar Jade on behalf of Latur Samachar and Printed at Jade Offset Printers Mitra Nagar Latur and Published at Mitra Nagar Latur.
Editor: Dayanand Shankar Jade Mo. 9422472502, RNI 47034/64, POSTAL NO. L2/RNP/OMD 52/24-26
हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक दयानंद शंकर जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर (महाराष्ट्र) येथे छापून येथेच प्रकाशित केले आहे. मुख्यसंपादकः दयानंद शंकर जडे मो. ९४२२४७२५०२ आरएनआय ४७०३४/६४, पोस्टल क्र. एल२/आरएनपी/ओएमडी-५२/२४-२६